रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक ५ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

रायगड, मंगळवार, दि. ११ जून २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

## खारघर येथे तरुणीवर अत्याचार

**पनवेल :** खारघर येथे राहणाऱ्या नातेवाईकांकडे राजस्थान येथून कामासाठी आलेल्या एका नराधमाने त्या घरातील १९ वर्षीय तरुणीवर बलात्कार करून तिचे अश्लील व्हिडीओ काढून तिला धमकावले. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. खारघर येथे १९ वर्षीय पीडित मुलगी आपल्या कुटुंबियांसह राहात होती. तिच्याकडे कामासाठी आलेल्या २५ वर्षीय नातेवाईकाने तिच्यावर बलात्कार करून तिचे अश्लील व्हिडीओ काढून तिला धमकाविल्याने याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## उल्हास नदीत एक बुडाला

**नेरळ :** कर्जत तालुक्यातून वाहणाऱ्या उल्हास नदीमध्ये शेलू येथे एक ११ वर्षीय मुलगा पाण्यात बुडून मृत्युमुखी पडला आहे. या मुलाच्या मृत्यूबाबत नेरळ पोलीस ठाण्यात अनाथाश्रमाच्या चार कामगारांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. ९ जून रोजी सायंकाळी सुनीता अशोक रामगिरी मुलांना उल्हास नदीवर पोहण्यासाठी घेऊन गेल्या होत्या. मात्र, त्याआधी त्या सर्व मुलांच्या पालकांची त्याबाबत कोणतीही परवानगी घेतली नव्हती. ११ वर्षीय दीपक गोपाळ सिंग मित्रांसह वाहत्या पाण्यात पोहताना अपघात घडला. पान २ वर

# निर्दयी बापाने पोटच्या गोळ्याचा घेतला जीव



**पाच महिन्यांच्या बाळाला जमिनीवर आपटले**

**उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्याच्या बोकडविरा येथील एका निर्दयी बापाने पाच महिन्यांच्या चिमुकलीला जमिनीवर आपटून ठार केल्याची घटना रविवारी (दि. ९) रात्रीच्या सुमारास घडली. पती-पत्नीमधील भांडणाच्या क्षुल्लक कारणावरुन निर्दयी बापाने तिचा जीव घेतला. रुही ठाकूर (५ महिने) असे निष्पाप चिमुकलीचे नाव आहे. दरम्यान, आरोपी बापाला पोलिसांनी अटक केली असून, पुढील तपास सुरू आहे.

उरण पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या बोकडविरा येथील खुशीराम ठाकूर असे आरोपी बापाचे नाव आहे. यासंदर्भात रुहीची आई अमृता खुशीराम ठाकूर यांनी उरण पोलिसात तक्रार केली. आरोपी खुशीराम ठाकूर याच्यासोबत अमृताचे दोन वर्षांपूर्वी लग्न झाले. त्या दोघांना रुही ही पहिलीच मुलगी झाली. खुशीराम नेहमीच दारु पिऊन पत्नीला मारहाण करायचा. तरीही ती लग्नानंतर एकत्र राहिली. त्यामुळे दररोज दोघांमध्ये भांडणे व्हायची.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अमृता खुशीराम ठाकूर ही विवाहित महिला आपले पती खुशीराम गजानन ठाकूर यांच्यासोबत बोकडविरा ग्रामपंचायत हद्दीत भाड्याच्या खोलीत काही दिवसांपासून राहात आहेत. अमृता व तिचे पती खुशीराम यांच्यात रविवारी दुपारच्या सुमारास भांडण झाले असता अमृता रुहीला घेऊन शेजारी राहात असलेल्या आपल्या नातेवाईक बिन्नीलाल बुधा राम यांच्या घरी गेली. मात्र, अंगात भूत संचालेल्या खुशीरामने अमृताच्या मागे जाऊन 'हमारी लडकी दे दो' असे बोलत मुलगी घेण्यावरून भांडण सुरू केले.



यावेळी आपल्या कुशीत असणाऱ्या रुहीला देण्यास अमृताने विरोध केला असता खुशीरामने रुहीला आईच्या ताब्यातून हिसकावून घेऊन जमिनीवर आपटले.

- या घटनेत रुहीच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने ती मरण पावली. बापाच्या कृत्याबद्दल संताप व्यक्त होत असून, कठोर शिक्षेचे मागणी करण्यात येत आहे.
- उरण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन आरोपी खुशीरामला ताब्यात घेतले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

# 'उमटे'च्या गाळाचा प्रश्न मार्गी लावणार

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

उमटे धरणातील गाळ काढण्यासाठी संघर्ष ग्रुपने लढा सुरू केला. अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक आणि आमच्या सीएफटीआय या संस्थेने सामाजिक बांधिलकी जपत मदतीचा हात दिला. त्यानंतर अनेकांनी पुढे येऊन मदत करण्यास सुरुवात केली. धरणातील गाळ काढण्याच्या कामाला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. गावातील तरुणांनी एकत्र येऊन दिलेल्या या लढ्याला यश आले आहे. पुढच्या वर्षी अधिक जोमाने काम करून धरणातील गाळ काढण्याचा प्रश्न कायमचा मार्गी लावणार, अशी ग्वाही शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी दिली.

उमटे धरणातील गाळ काढण्याच्या कामाचा समारोप आणि उमटे धरण संघर्ष ग्रुपच्या वतीने आभाराचा कार्यक्रम रविवारी (दि. ९) आयोजित केला होता.

| 12 | 40 | 24 |
|---|---|---|
| ग्रा.पं.मधील ४७ गावांना आधार | हजारांहून अधिकांना पाणी | दिवस अहोरात्र काम |

### चित्रलेखा पाटील यांची ग्वाही

### उमटे धरण गाळमुक्त होण्याच्या मार्गावर

उमटे धरणामार्फत तालुक्यातील १२ ग्रामपंचायत हद्दीमधील ४७ गावे, ३० हून अधिक वाड्यांना पाणीपुरवठा केला जातो. ४० हजारांहून अधिक नागरिकांना या पाण्याचा आधार आहे. उमटे धरण गाळात रुतल्याने पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक व शेतकरी कामगार पक्षाच्या महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी हा गाळाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घेतला. गाळ काढण्यासाठी लागणारे इंधन व यंत्रसामुग्री स्वखर्चाने उभी केली. सर्व शासकीय परवानगी घेऊन १७ मेपासून ९ जूनपर्यंत हे काम अविरतपणे सुरू होते. धरणातून हजारो ब्रास माती काढण्यास यश आले आहे. त्यामुळे उमटे धरण गाळमुक्त होण्याच्या मार्गावर असल्याचे चित्र दिसून येत आहे.





(छायाचित्र : अमोल नाईक)

चित्रलेखा पाटील यांचा सन्मानपत्र देऊन गौरव

### आ. जयंत पाटील यांच्याकडून पाहणी

अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक व शेकापच्या महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी सामाजिक बांधिलकी जपत उमटे धरणातील गाळ काढण्यास सुरुवात केली. शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी धरणाला भेट दिली होती. प्रशांत नाईक, चित्रलेखा पाटील व उमटे धरण संघर्ष ग्रुपचे राकेश पाटील आणि त्यांच्या टीमचे कौतुक केले. गाळ काढण्यासाठी आता कमी वेळ मिळाला. मात्र, पुढच्या काळात लवकरच गाळ काढण्याचे काम सुरु करून धरणातील गाळाचा प्रश्न मार्गी लावू, अशी ग्वाही दिली. त्यामुळे या धरणाला नवसंजीवनी मिळणार आहे.

यावेळी चित्रलेखा पाटील बोलत होत्या. याप्रसंगी चित्रलेखा पाटील, प्रशांत नाईक यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी महेश पाटील व इतर मान्यवर यांचा शाल, श्रीफळ, सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

पुढे चित्रलेखा पाटील म्हणाल्या, महात्मा फुलेंसह काही महापुरुष त्या काळी पान २ वर

### बसवर दहशतवादी हल्ला

# १० भाविक ठार, ३३ जखमी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

नरेंद्र मोदी पंतप्रधानपदाची शपथ घेत असतानाच जम्मू-कश्मीरमध्ये भयंकर दहशतवादी हल्ला करण्यात आला. वैष्णोदेवी दर्शनाला जाणाऱ्या भाविकांच्या बसवर श्रीनगरमध्ये दहशतवाद्यांनी अंदाधुंद गोळीबार केला. त्यामुळे चालकाचा बसवरील ताबा सुटून बस दरीत कोसळली. त्यात १० भाविकांचा जागीच मृत्यू झाला, तर चालकासह ३३ जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे.



रियासी जिल्ह्यातील पोनी परिसरातील तिरयाथ गावाजवळ हा हल्ला झाला. पोलिसांची अतिरिक्त कुमक, लष्कर, निमलष्करी दलाचे जवान बचावकार्यासाठी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. रात्री उशिरापर्यंत बचावकार्य सुरुच होते. ही बस भाविकांना घेऊन शिव खोडी मंदिर येथून कटरा येथे माता वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी जात होती, अशी माहिती पोलीस अधीक्षक मोहित शर्मा यांनी दिली. बसमध्ये ५३ प्रवासी होते.

## मला मंत्रीपद सोडायचंय?

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

केरळमधील भाजपचे एकमेव आणि पहिले खासदार सुरेश गोपी यांनी रविवारी केंद्रीय मंत्रीपदाची शपथ घेतली. राज्यमंत्री म्हणून त्यांचा मोदी मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला आहे. पण गोपी हे आता मंत्रिपद सोडण्याची शक्यता आहे. एका प्रादेशिक वृत्तवाहिनीशी बोलताना त्यांनी मंत्रीपद सोडण्याची इच्छा व्यक्त केली आहे. मी मंत्रिपद मागितलं नव्हतं. मला पक्षश्रेष्ठी या पदावरून मोकळं करतील अशी पान २ वर

# मोदी सरकारचे खातेवाटप

### शहा, राजनाथ, गडकरींना पुन्हा तेच मंत्रालय

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी लागोपाठ तिसऱ्यांदा मंत्रीपदाची शपथ घेतली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह एनडीएच्या घटकपक्षांच्या खासदारांनीही मंत्रीपदाची शपथ घेतली, यानंतर सोमवारी (दि. १०) या मंत्र्यांचं खातेवाटप जाहीर झालं आहे. अमित शहा, राजनाथ



**असे असेल मोदींचे मंत्रिमंडळ**

राजनाथ सिंह- संरक्षण, अमित शहा- गृह, अश्विनी वैष्णव- रेल्वे आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालय, एस. जयशंकर- परराष्ट्र, नितीन गडकरी- परिवहन, रस्ते विकास, अजय टमटा- परिवहन आणि रस्ते राज्यमंत्री, हर्ष मल्होत्रा - परिवहन आणि रस्ते राज्यमंत्री, मनोहरलाल खट्टर- ऊर्जा आणि शहर विकास मंत्रालय, शिवराज सिंह चौहान- कृषी आणि किसान कल्याण, पंचायत तथा ग्रामविकास मंत्रालय, जीतन पान २ वर

# कृषीवलच्या दणक्याने 'महसूल'ला जाग

- अनधिकृत भरावाचा पंचनामा, नदीतील भरावाचं काय?
- जलसंपदा खाते अद्याप निद्रावस्थेत



**। पेण । प्रतिनिधी ।**

३१ मे रोजी दैनिक कृषीवलमध्ये 'भोगावती नदीमध्ये अनधिकृत बांधकाम' या मथळ्याखाली भोगावती नदीमध्ये केलेल्या अतिक्रमणाची बातमी लावल्यानंतर महसूल खाते खडबडून जागे झाले. मात्र, जलसिंचन खाते निद्रावस्थेतच. महसूलकडून मंडळ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. त्या पंचनाम्यानुसार, ८० मीटर लांब, १५ मीटर रूंद आणि एक मीटर उंच भरावासाठी ४० ब्रास डबरचा वापर केल्याचे म्हटले आहे. परंतु, यामध्ये हे बांधकाम नदीत केले आहे की नाही, याबद्दल काहीही उल्लेख केलेला नाही. महत्त्वाची बाब म्हणजे, प्रसार माध्यमाची तक्रार ही नदीत बांधलेल्या बांधकामासंदर्भात होती. परंतु, महसूल खात्याकडून नदीतील अनधिकृत बांधकामाबद्दल एकही अक्षर लिहिले गेले नाही.

अनधिकृत उत्खनन म्हणून डबर दाखविले आहे, मातीचा उल्लेख नाही. तसेच या अनधिकृत उत्खननाबाबत १,८५,३१० रू. दंडात्मक कारवाई केलेली आहे. ही कारवाई संजय अनंत म्हात्रे यांच्या नावाने असून, हे अनधिकृत बांधकाम दांडेकर नामक व्यक्तीने केलेले आहे. जमीन मालकाला याबाबत कोणतीही पुसटशी कल्पना नाही. पंचनामा करून ९ दिवस उलटून गेलेले आहेत. परंतु, जमीन मालकाकडून केलेल्या कारवाईसंदर्भात कोणतेच लेखी उत्तर आलेले नाही. सात दिवसांच्या आत लेखी उत्तर महसूल खात्याने मागितले होते. परंतु, उत्तर दिले नाही. याचाच अर्थ, अनधिकृत उत्खनन व बांधकाम झालेले आहे, हे निश्चित. परंतु, हे बांधकाम नदीत झालेले असताना पंचनाम्यामध्ये उल्लेख नाही. याबाबत तहसीलदार तानाजी शेजाळ यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, आम्ही जलसिंचन विभागाला पत्रव्यवहार करीत आहोत. नदीमध्ये बांधकाम झाले आहे की नाही, याबाबत त्यांनी पाहायचे आहे. गेली कित्येक वर्षे भोगावती नदीबाबत हेच होत आलेले आहे. पान २ वर

## सरकार ताळ्यावर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

लोकसभा निवडणुकीत बहुमत गमावल्यानंतर सत्ताधारी भाजप ताळ्यावर आल्याचे चित्र असून, नरेंद्र मोदींनी पंतप्रधानपद स्वीकारल्यानंतर पहिली सही पीएम किसान योजनेच्या फाईलवर केल्याचे दिसून आले. एमएसपी कायदा आणि इतर मागण्यांसाठी शेतकऱ्यांनी दिल्लीच्या सीमेवर मोठे आंदोलन करत गेल्या टर्ममध्ये मोदी सरकारला धारेवर धरले होते. शेतकऱ्यांचे हे आंदोलन वेगवेगळ्या मार्गाने हाणून पाडण्याचा प्रयत्न झाला. यामुळे निवडणुकीत भाजपला मोठा फटका बसला. केंद्रात एनडीएचे सरकार स्थापन झाल्यानंतर भानावर आलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी पान २ वर

# महायुतीमध्ये खदखद

### शिंदे गटाची नाराजी उघड

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मोदी सरकारमध्ये शिंदे गटाला केंद्रीय राज्यमंत्री पद देऊन भेदभाव करण्यात आला आहे. आमचा स्ट्राईट रेट पाहता आम्हाला केंद्रीय कॅबिनेट मंत्रीपद द्यायला हवं होतं, असं म्हणत शिंदे गटाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी खदखद व्यक्ती केली आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे महायुतीमधील खदखद पुन्हा समोर आली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार करताना न्यायिक भूमिका घ्यायला हवी होती. एनडीएमध्ये अनेक पक्षांना कमी जागा असताना त्यांना कॅबिनेट मंत्रीपद देण्यात आले आहेत. त्यामुळे शिंदे गटासोबत दुजाभाव का करण्यात आला? आमच्याकडे सात खासदार आहेत. त्यामुळे आम्हाला कॅबिनेट मंत्रीपद मिळायला हवं होतं, असं बारणे म्हणाले.



लोकसभा निवडणुकीमध्ये शिंदे गटाने १५ उमेदवार उभे केले होते, त्यातील सात उमेदवार निवडून आले आहेत. मोदी सरकारच्या मंत्रिमंडळात शिंदे गटातील एका खासदाराला कॅबिनेट मंत्रीपद आणि एकाला राज्यमंत्री पद मिळण्याची शक्यता होती. पण, त्यांना फक्त राज्यमंत्रीपद मिळालं आहे. मंत्रिपदासाठी श्रीकांत शिंदे, श्रीरंग बारणे आणि प्रतापराव जाधव या तीन नावांची चर्चा होती. यात प्रतावराव जाधव यांची राज्यमंत्रीपदी वर्णी लागली आहे. श्रीरंग बारणे हे तिसऱ्यांदा खासदार झाले आहेत. त्यांना मंत्रीपद मिळण्याची दाट शक्यता होती. पण, शिंदे गटाला एकच मंत्रीपद देण्यात आल्याने जाधव यांना संधी देण्यात आली. त्यामुळे बारणे काहीसे नाराज असल्याचं बोललं जातं.

# पर्यटक परतीच्या मार्गावर

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

जैवविविधतेने नटलेले विलोभनीय निसर्ग सौंदर्य व २४० किमीचा विस्तीर्ण समुद्र किनारा तसेच ऐतिहासिक व धार्मिक स्थळे यामुळे उन्हाळी सुट्ट्यांमध्ये पर्यटकांची पावले रायगड जिल्ह्याकडे वळतात. उन्हाळी सुट्ट्या या आठवड्यात संपत आहेत. त्यामुळे शनिवार (दि.८) व रविवारी (दि. ९) जिल्ह्यामधील पर्यटनस्थळे पर्यटकांनी बहरली होती. उन्हाळी पर्यटनाचा हा अखेरचा टप्पा असून, आता पर्यटकांची पावले परतीच्या मार्गाला लागली आहेत.

पुणे-मुंबईसह महाराष्ट्र व राज्याबाहेरील निरनिराळ्या ठिकाणच्या पर्यटकांची पावले पान २ वर



### समुद्रकिनारे फुल्ल

अलिबाग– नागाव, वरसोली, मुरुड– काशिद, श्रीवर्धन– दिवेआगर, हरिहरेश्वर येथील समुद्रकिनारे पर्यटकांना भुरळ घालत आहेत. हे सर्व समुद्रकिनारे पर्यटकांनी हाऊसफुल्ल झाले आहेत. पावसाच्या तोंडावर सध्या बोटींग, बनाना, बाईक राईड, पॅरा ग्लायडिंग आदी सर्व राइट्स प्रशासनाने बंद केल्या आहेत. त्यामुळे पर्यटकांचा हिरमोड झाला. मात्र, घोडागाडीवाले, एटीव्ही राईड्सवाले व उंटवाले असल्याने पर्यटकांनी याचा आनंद घेतला.

# शाळांमध्ये १५ जूनला प्रवेशोत्सव

**। रायगड । प्रतिनिधी ।**

१५ जूनपासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होत असून, शिक्षण विभागाची जय्यत तयारी सुरु आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी प्रवेशोत्सव राबविण्यात येणार असून, शाळांचा परिसर सजविण्यासोबत पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत, प्रभातफेरी, पुस्तके वाटप करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. त्याचबरोबर एकही बालक शाळाबाह्य राहणार नाही याची काळजी घेतली जात असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड व प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव यांनी दिली आहे.

रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषद तसेच अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना शासनाकडून पाठ्यपुस्तके देण्यात येतात. ही पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी मिळतील असे नियोजन करण्यात येत आहे. सरकारच्या बालभारती विभागाकडे शिक्षण विभागाने पुस्तकांची मागणी केली होती. सरकारकडून पुस्तके प्राप्त झाली असून, ही पुस्तके तालुक्याच्या गटशिक्षण अधिकाऱ्यांमार्फत केंद्रप्रमुख व केंद्रप्रमुखांच्या माध्यमातून मुख्याध्यापकांकडे सुपूर्द करण्यात येत आहेत. रायगड जिल्ह्यातील पहिली ते आठवीपर्यंतच्या १ लाख ८४ हजार १६२ विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात येणार आहेत.

जिल्ह्यात एकही शाळाबाह्य विद्यार्थी राहणार नाही या दृष्टीने शिक्षण विभागामार्फत पावले उचलण्यात येत आहेत. १५ जून रोजी शाळा सुरु होणार आहेत. त्यापूर्वी ६ ते १४ वयोगटातील एकही विद्यार्थी शिक्षणापासून दूर राहू नये, यासाठी प्रवेश पात्र बालकांच्या याद्या ग्रामपंचायत व शाळा फलकावर प्रदर्शित करण्यात येणार आहेत. प्रवेश पात्र बालकाची यादी लाऊडस्पीकरवर घोषित करून शैक्षणिक पदयात्रा व शिक्षकांच्या गृहभेटी व सरपंच, गावकरी, व्यवस्थापन समिती सदस्य, युवक, बचतगट, ज्येष्ठ नागरिकांसह सर्वांच्या गृहभेटींचे नियोजन करण्यात आले आहे.

जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पहिल्याच पान २ वर

### सेवा सुविधांचा लाभ

जिल्हा परिषदेच्या शाळांचे रूप पूर्णपणे बदलून गेले आहे. डिजिटल क्लासरूम्स, कृतीयुक्त अध्ययन, विविध खेळ, सहशालेय व अभ्यासपूरक ज्ञानरचनावादी उपक्रम राबविले जात आहेत. तसेच मूल्य शिक्षणावर विशेष भर, प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष दिले जात आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रशिक्षित उच्च शिक्षित शिक्षक, तसेच विद्यार्थ्यांना शाळेत मोफत प्रवेश, मोफत गणवेश, मोफत मध्यान्ह भोजन, उपस्थिती भत्ता, शिष्यवृत्ती, संगणक शिक्षण या सुविधांचा लाभ दिला जात आहे.



# गळक्या इमारतींना प्लास्टिकचा आधार



**। उरण । वार्ताहर ।**

कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात असलेल्या उरण पोलीस ठाण्याच्या इमारतींना पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात गळती लागत आहे. त्यामुळे यावर उपाययोजना करण्यासाठी पोलीस अधिकारी वर्गाने आपल्या कार्यालयातील महत्त्वाचे दस्तावेज पावसाच्या पाण्यात भिजून जाऊ नये यासाठी पावसाला सुरु होण्यापूर्वी गळक्या इमारतींना प्लास्टिकच्या ताडपत्रीचा आधार देण्याचे काम हाती घेतले आहे.

उरण तालुक्याच औद्योगिकीकरण आणि नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. या तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी महत्त्वाची भूमिका उरण पोलीस ठाण्याचे अधिकारी व पोलीस कर्मचारी बजावत आहेत. मात्र, सुसज्ज इमारतीचा अभाव यामुळे पोलीस ठाण्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना जीर्ण व गळक्या इमारतीचा आधार घेऊन आपापली कामे करावी लागत आहेत. त्यामुळे पावसाळ्यात पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

यावर ठोस उपाययोजना करण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले जात नसल्याने यावर्षीच्या पावसाळ्यात खबरदारी म्हणून पोलिसांनी आपल्या गळक्या कार्यालयाच्या इमारतींच्या छतावर चढून प्लास्टिकच्या ताडपत्रीचा आधार देण्याचे काम केले आहे.

# पोयनाडला स्तन, गर्भाशय मुखाचा कर्करोग शिबीर

**। भाकरवड । वार्ताहर ।**

रायगड मेडिकल असोसिएशन, मदरहूड हॉस्पिटल खारघर व प्राथमिक आरोग्य केंद्र पोयनाड यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ९) सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत स्तन व गर्भाशय मुखाचा कर्करोग आणि मोफत आरोग्य तपासणी शिबीर प्राथमिक आरोग्य केंद्र, पोयनाड येथे आयोजित करण्यात आला होते.

या शिबिरामध्ये गर्भाशयाच्या कर्करोगाचे लवकरात लवकर निदान करण्याकरिता आवश्यक असलेली पॅप स्मिअर ही चाचणी तसेच मुली व स्त्रियांमध्ये होणाऱ्या स्तन गर्भाशायाच्या कर्करोगाविषयी समुपदेशन करण्यात आले. यावेळी उपस्थित मुली व महिला यांची त्याअनुषंगाने आरोग्य तपासणी करण्यात आली. आरएमएचे कार्यवाह डॉ. राजेंद्र चांदोरकर यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सादर केली, तर अध्यक्ष डॉ. निशिगंध आठवले यांनी उपस्थित महिलांना आरोग्य मार्गदर्शन केले.



(छायाचित्र : जीवन पाटील)

साधारण ७७ लाभार्थी (मुली व महिलांनी) या शिबिराचा लाभ घेतला. त्यापैकी १६ महिलांच्या पॅप स्मिअर टेस्ट्स झाल्या. मदरहूड हॉस्पिटल येथील स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. श्रुती माने व डॉ. श्रुती उगरण यांनी गर्भशय मुखाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग यासंदर्भात आपले विचार मांडले, तसेच रुग्णतपासणी व गरजू महिलांच्या पॅप स्मिअर टेस्ट्स केल्या.

पोयनाड प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पद्मश्री अंधेळकर, डॉ. औदुंबर कोळी व डॉ. स्मितल पाटील यांनी समन्वयक म्हणून हातभार लावला, तर डॉ. सुनीता पाटील, डॉ. रेखा म्हात्रे, डॉ. ओंकार पाटील यांनी व आरोग्य केंद्रातील पर्यवेक्षिका यांनी रुग्ण नोंदणीसाठी मदत केली.

कार्यक्रम यशस्वी करण्यात डॉ. मकरंद पाटील, डॉ. युगेश पाटील, डॉ. प्रशांत बैकर, डॉ. भक्ती पाटील यांनी मेहनत घेतली. पोयनाड प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्यसेविका व इतर स्टाफने मदत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरएमएचे कार्यवाह बालरोग तज्ज्ञ डॉ. राजेंद्र चांदोरकर यांनी केले. उपस्थितांचे आभारप्रदर्शन खजिनदार डॉ. नवलकिशोर साबू यांनी केले.


## जाहीर नोटीस

दि. १०/०६/२०२४

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक प्रगती मनोहर वाकडे, वगैरे यांच्याकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे सदरची मिळकत हि. निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रंमाक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| आंबेपुर ता. अलिबाग | ७३/२/अ/१/अ/१ | ०-४५-७० पो.ख. १०-१३-३० एकुण ०-५९-०० | ०.०० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी ०-३०-०० हे.आर. हि मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरिल मिळकतींचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिध्द झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतींचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी (पळी आंबेघर), पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९


## पान १ वरून

# उल्हास नदीत एक बुडाला

याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर दहातोंडे हे करीत आहेत. त्या ठिकाणी अपघात झाला त्यावेळी संस्थचे कामगार केतन सोनी तसेच शीतल, नितीन, प्रियांका या तेथे बसून होत्या, पण पाण्यात उतरल्या नव्हत्या. त्यामुळे त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 'उमटे'च्या गाळाचा प्रश्न मार्गी लावणार

खूप श्रीमंत होते. मात्र, त्यांनी दातृत्वाची भूमिका घेत समाजाच्या हिताचे काम केले. बांधिलकी जपत शिक्षणाची दारे खुली केली. तो विचार घेत उमटे धरणातील गाळ काढण्यासाठी अलिबागमधील ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुण एकत्र आले. त्यामध्ये ॲड. राकेश पाटील यांच्यासह अनेक तरुणांनी रात्रीचा दिवस करून काम केले. त्यांनी उमटे धरण संघर्ष ग्रुप तयार करून लढा दिला. त्यामुळे आज परिवर्तन होत असल्याचे दिसून येत आहे. या वेगळ्या लढ्यामुळे समाजात अमूलाग्र बदल होऊ शकतो. हे संघर्ष ग्रुपने दाखवून दिले आहे. आज या ग्रुपला वेगवेगळ्या संस्था, संघटनेकडून पाठिंबा मिळत असल्याचा आनंद आहे, असे चित्रलेखा पाटील यांनी सांगितले.

यावेळी चित्रलेखा पाटील यांच्यासमवेत अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांचे प्रतिनिधी महेश पाटील, उमटे धरण संघर्ष ग्रुपचे प्रमुख ॲड. राकेश पाटील, माजी सरपंच मोहन धुमाळ, उद्योजक सचिन राऊळ, ॲड. सुहास कारुळकर, रुपेश पाटील, नंदेश गावंड, मनेश पाटील, तृप्ती गावंड, देवीदास थळे, विक्रांत वार्डे, अमोल नाईक, रामदास शिंदे, योगेश गुजर, प्रमोद सांदणकर, विनायक भोनकर, बाळकृष्ण गावंड, प्रीतम गुंड, योगेश पाटील, रणजीत भांजी, अक्षय डिकले आदींसह वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळी, सीएफटीआय, उमटे धरण संघर्ष ग्रुपचे पदाधिकारी, सभासद उपस्थित होते.

उमटे धरणातील पाण्याच्या प्रश्नाबाबत गेल्या अनेक वर्षांपासून लढा सुरु केला.गावबैठकीतून ग्रामस्थांना एकत्र आणले. शासन दरबारी पाठपुरावा केला. अखेर गाळ काढण्यासाठी माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, चित्रलेखा पाटील यांनी पुढाकार घेतला. त्यामुळे गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात झाली. या प्रयत्नांना यश आले. उमटे धरण गाळ मुक्त होण्याचे स्वप्न लवकरच पूर्ण होणार आहे.

- तृप्ती गावंड

# कृषीवलच्या दणक्याने 'महसूल'ला जाग

कारवाई महसूल खात्याने करायची की जलसिंचन खात्याने, हा वाद संपतच नाही. त्यामुळे मुंबई-गोवा महामार्गापासून भोगावतीच्या उगम स्थानापर्यंत मोठ्या प्रमाणात नदीपात्रात अतिक्रमण झालेले आहे. भविष्यात याचा फटका नदीकिनारी राहणाऱ्या गावांबरोबर पेण शहरालादेखील झाल्याशिवाय राहणार नाही.

# जनमताच्या दणक्यानंतर सरकार ताळ्यावर

यांना शपथविधीनंतर पहिली सही शेतकऱ्यांसाठी करावी लागली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकरी सन्मान निधी म्हणजे पीएम किसान योजनेंतर्गत शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीला मंजुरी दिली आहे. नव्या सरकारमधील शेतकऱ्यासांठीचा हा पहिला हप्ता आहे. यानुसार शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर २००० रुपये जमा होणार आहेत. पीएम किसान योजना म्हणजेच शेतकरी सन्मान निधी ही योजना २०१९ पासून सुरू झाली. या योजनेनुसार शेतकऱ्यांना दिला जाणारा हा १७ वा हप्ता असेल. या योजनेनुसार दरवर्षी शेतकऱ्यांना दोन हजार रुपयांचे तीन हप्ते दिले जातात. वर्षाला एकूण सहा हजार रुपयांची आर्थिक मदत शेतकऱ्यांना केंद्र सरकारद्वारे करण्यात येते.

मोदी यांनी या योजनेच्या १७ व्या हप्त्याला मंजुरी दिल्यामुळे साधारण ९.३ कोटी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात आता २००० रुपये येणार आहेत. केंद्र सरकारतर्फे शेतकऱ्यांना एकूण २० हजार कोटी रुपये दिले जातील. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना प्रत्येक वर्षाला ६ हजार रुपये मिळतात. मोदी यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळात या योजनेची सुरुवात केली होती. लोकसभा निवडणुकीच्या अगोदर शेतकऱ्यांच्या बँक खात्यात या योजनेचा १६ वा हप्ता आला होता.

# मला मंत्रीपद सोडायचं?

आशा आहे, असं सुरेश गोपी यांनी म्हटलं आहे.

सुरेश गोपी यांनी मंत्रीपद सोडण्यासाठीची अनेक कारणे सांगितली आहेत. मी अनेक सिनेमे साईन केले आहेत. ते पूर्ण करायचे आहेत. तसेच त्रिशूर लोकसभा मतदारसंघाचा खासदार म्हणून मला काम करायचं आहे. त्यासाठी मोकळा वेळ हवा आहे, असं सुरेश गोपी यांनी स्पष्ट केलं. सुरेश गोपी हे केरळमधून निवडून आलेले भाजपचे पहिले खासदार आहे. केरळमधील भाजपचा हा पहिला विजय आहे. सुरेश गोपी हे त्रिशूर लोकसभा मतदारसंघातून निवडून आले आहेत. त्यांनी भाजपचा पहिला खासदार म्हणून इतिहासात स्वतःचं नाव कोरलं आहे. त्यांनी भारतीय कम्युनिस्ट पार्टीचे उमेदवार व्ही. एस. सुनीलकुमार यांचा ७४,६८६ मतांनी पराभव केलाय.

# मोदी सरकारचे खातेवाटप जाहीर

राम मांझी- लघु, सुक्ष्म आणि मध्यम उद्योग मंत्रालय, निर्मला सीतारमण- अर्थ मंत्रालय, सीआर पाटील- जलशक्ती मंत्रालय, जे.पी. नड्डा- आरोग्य मंत्रालय, चिराग पासवान- क्रीडा, किरेन रिजिजू - संसदीय कार्य, मनसुख मांडविया - कामगार, श्रीपाद नाईक - ऊर्जा राज्यमंत्री, अनुपूर्णा देवी - महिला आणि बाल विकास, राम मोहन नायडू - नागरी उड्डाण, सर्वानंद सोनोवाल - पोर्ट शिपिंग, शांतनू ठाकूर - पोर्ट शिपिंग राज्यमंत्री, शोभा करंदलाजे- सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग राज्यमंत्री, धर्मेंद्र प्रधान - शिक्षण, एचडी कुमार स्वामी - अवजड उद्योग, शोभा करंदलाजे - सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग राज्यमंत्री, ज्योतिरादित्य सिंधिया - टेलिकॉम, भूपेंद्र यादव -पर्यावरण, प्रल्हाद जोशी - ग्राहक संरक्षण, रवनीत बिट्टू - अल्पसंख्याक राज्यमंत्री, गजेंद्र शेखावत - कला, पर्यटन, सांस्कृतिक, सुरेश गोपी - कला, पर्यटन, सांस्कृतिक राज्यमंत्री, पीयूष गोयल - वाणिज्य.

**महाराष्ट्राच्या वाट्याला दोन कॅबिनेट, चार राज्यमंत्रीपद**

मोदी सरकारच्या मंत्रिमंडळात महाराष्ट्रातील २ खासदारांना कॅबिनेटमंत्री करण्यात आलं आहे. तर ४ खासदारांना राज्यमंत्रीपद देण्यात आलं आहे. यामध्ये एक स्वतंत्र प्रभार राज्यमंत्रीपद आहे. महाराष्ट्रातून नितीन गडकरी आणि पीयूष गोयल यांना केंद्रीय कॅबिनेट मंत्रिपद देण्यात आलं आहे. तर रक्षा खडसे आणि मुरलीधर मोहोळ यांना राज्यमंत्रीपद देण्यात आलं आहे. तर शिवसेनेचे खासदार प्रतापराव जाधव यांना राज्यमंत्री स्वतंत्र प्रभार देण्यात आलं आहे.

# शाळांमध्ये १५ जूनला प्रवेशोत्सव

दिवशी स्वागत करण्यासाठी शाळांना तोरणे लावण्यात येणार आहेत. रांगोळ्या काढण्यात येतील. विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांमार्फत स्वागत करण्यात येणार आहे. काही ठिकाणी विद्यार्थ्यांना पुष्प देऊन स्वागत करण्यात येईल. गावात, वॉर्डात प्रभातफेरी काढण्यात येईल. या प्रभातफेरीत युवक, गावकरी, ज्येष्ठ नागरिकांना प्रभातफेरीमध्ये सहभागी होण्याची विनंती करण्यात येणार आहे. तसेच शाळेच्या पहिल्या दिवशी जिल्हस्तरीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भेटीचे नियोजन करण्यात आले आहे. वर्षभर १०० टक्के उपस्थिती ठेवण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांची माहिती देणे तसेच एकही विद्यार्थी शाळेबाहेर राहणार नाही, अशी उपस्थितांसह प्रतिज्ञा घेण्यात येणार असल्याची माहिती प्राथमिक शिक्षण विभागाने दिली आहे.

# पर्यटक परतीच्या मार्गावर

जिल्ह्यातील पर्यटन स्थळांकडे वळतात. यंदा लोकसभा निवडणूक असल्यामुळे मे महिन्याच्या मध्यावरदेखील पर्यटकांची गर्दी दिसत नव्हती. मात्र, सध्या सर्व ठिकाणी पर्यटकांची गर्दी आहे. यामुळे पर्यटनावर अवलंबून असलेले हॉटेल व्यावसायिक, खानावळी, छोटे-मोठे दुकानदार, वाहतूकदार, राईड्सवाले यांची सध्या चलती आहे. पर्यटकांच्या वाहनांमुळे मुंबई-गोवा महामार्ग, पाली-खोपोली राज्य महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई-बंगळुरू महामार्ग आदी मार्गांवर गर्दी होत आहे. तर, काही ठिकाणी वाहतूक कोंडीदेखील पाहायला मिळत आहे.

**येथे गर्दी**

जिल्ह्यातील प्रसिद्ध असलेले थंड हवेचे ठिकाण माथेरान पर्यटकांनी फुल्ल आहे. अष्टविनायकांपैकी दोन गणपती हे रायगडमध्ये आहेत. ते म्हणजे खालापुर तालुक्यातील महडचा वरदविनायक आणि सुधागड तालुक्यातील पालीचा बल्लाळेश्वर. या ठिकाणी भाविकांची दर्शनासाठी रीघ पाहायला मिळाली. शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्यावर शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने भेट दिली. मुरुड आणि अलिबाग समुद्रकिनाऱ्याची मजा लुटतानाच पर्यटक येथे असलेल्या मुरुड जंजिरा आणि कुलाबा किल्ल्याला आवर्जून भेट देत आहेत. दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वरला पर्यटकांसह भाविकांचीही पसंती असते. कारण, एकाच ठिकाणी भव्य समुद्रकिनारा आणि देवदर्शन अशा दोन्ही गोष्टींचा सुरेख संगम तेथे साधता येतो.

**रिसॉर्ट व फार्म हाऊस**

शहरातील मंडळींना ग्रामीण भागात असलेले रिसॉर्ट, फार्महाऊस व ॲग्रो टुरिझमचे आकर्षण आहे. निसर्गरम्य वातावरण, शुद्ध हवेचा व सात्विक खाण्याचा ते आनंद घेतात. शिवाय काही काळ मोबाईल नेटवर्कपासून दूर गेल्याने रिफ्रेश होतात. स्विमिंगपूल असलेल्या रिसॉर्ट व फार्महाऊसला अधिक मागणी आहे. येथे मित्रमंडळी, बच्चेकंपनी, महिला मस्त डुंबण्याचा आनंद घेतात. याबरोबरच चुलीवरचे जेवण, टेंट, कॅम्पेन आणि निसर्ग सफर ट्रेकिंग आणि स्विमिंगपूलमध्ये डुंबण्याचा आनंद पर्यटक घेतात.

**उन्हाळी सुट्ट्यांमध्ये अनेकजण मित्रपरिवार व कुटुंबासमवेत निसर्गरम्य वातावरणात राहणे पसंत करतात. उष्म्यामुळे स्विमिंगपूलला अधिक पसंती आहे. येथे विविध ॲक्टिव्हिटीसुद्धा घेतल्या जातात. स्थानिकांना रोजगार मिळतो. उन्हाळी सुट्ट्यांचा हा शेवटचा हंगाम आहे.**

**- संतोष बावधाने, मालक, माऊंटन व्ह्यू फार्म अँड कॅम्पेन, गौळमाळ**

**उन्हाळी सुट्ट्यांमध्ये पर्यटक इतरत्र फिरून समुद्र किनारी राहणे व मज्जा करणे पसंत करतात. त्यामुळे समुद्रकिनारे फुल्ल आहेत. अनेकांनी आगाऊ बुकिंग केली होती. उन्हाळी सुट्ट्या संपत आल्याने आता पर्यटक परतीच्या मार्गाला लागले आहेत.**

**- गणेश सावंत, चालक, माऊ रिसॉर्ट, दिवेआगर**

**उन्हाळी सुट्ट्यांमध्ये पर्यटकांच्या संख्येत वाढ झाली. सध्या उन्हाळी पर्यटनाचा हंगाम सरत असून, समुद्रावरील विविध राईड्स पावसाळ्याच्या तोंडावर बंद करण्यात आल्या आहेत. येणारे भाविक व पर्यटक समुद्र किनारी फिरतात. तसेच देवळामध्ये धार्मिक विधीदेखील करतात.**

**- अमित खोत, मालक, विश्रांती रेसिडेन्सी, हरिहरेश्वर**

# शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे अनावरण

**रसायनी :** चौक तुपगाव येथे मानाचा राजा कला संस्कृती क्रीडा मंडळ तुपगाव यांच्या दहा वर्षांच्या अथक प्रयत्नाने शिवराज्याभिषेक दिनी श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे अनावरण करण्यात आले.

सकाळी ९ वाजता श्री गणेशपूजन, विधिवत पूजा करून व दिवसभर कार्यक्रम करुन सायंकाळी ७ वाजता उरणचे माजी आमदार मनोहर भोईर, उद्योजक विनोद भोईर, तूपगांवचे सरपंच रवींद्र कुंभार यांच्या उपस्थितीत अनावरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

विशेष म्हणजे चौक परिसरात महाराजांचे स्मारक कुठेच यापूर्वी पाहायला मिळाले नाही.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे महाळुंगे खुर्द, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या जिरायत मिळकतीचे विद्यमान मालक मित्राक्षी प्रशांत तांडेल, रा. ओम निवास, स्वामी समर्थ नगर, पिंपळभाट, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली जिरायत मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा ठराव व बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| महाळुंगे खुर्द ता. मुरुड | २५/२ | ०-६२-०० पो.ख. ०-११-०० एकूण ०-७३-०० | ०.८६ |

सदर वर नमूद मिळकतीपैकी विद्यमान मालक मित्राक्षी प्रशांत तांडेल यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील व मालकीहक्कातील ०-२०-०० हे. आर., आकार रु. ०.२८ पैसे या मिळकतीबाबत.

सबब सदरहू जमिन मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १०/०६/२०२४

सही/-
**ॲड. विवेक संजय जोशी**
जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग
मो. ८८८८९९८१००



दिनांक : १०/०६/२०२४

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमूद केलेली मिळलकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी श्री. रमेश बाळाराम पाटील यांचेसोबत चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याची आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मिळकतीचे वर्णन**

**जिल्हा परिषद रायगड, दुय्यम निबंधक सो. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| कार्ले ता. अलिबाग | १११ | जिरायत ०-२६-६० वरकस ०-०८-८० ०-३५-४० पो.ख. ०-१२-१० एकूण क्षेत्र ०-४७-५० | ७.१९ |

सदरील मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहेत.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क, कुळअखत्यारपत्र आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. प्रथमेश अरूण पाटील**
जिल्हा व सत्र न्यायालय, रायगड-अलिबाग
रूम नं. ५, सागर दर्शन प्लाझा बिल्डींग
समाधान हॉटेलसमोर, कलेक्टर ऑफिसजवळ
रामनाथ रोड, अलिबाग ४०२ २०१
मो. ८००७८५५४५५/९९२१५५०५९५



सिडको
शहरांचे शिल्पकार

## नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण ''ना हरकत पत्र'' मागणी अर्जानुसार नोटीस सर्व **श्री. रतन जगन्नाथ भगत, राहणार – ११०२ व ११०३, फेबर माऊंट, प्लॉट क्र. ४, ५, ६, सेक्टर–१७, सानपाडा, नवी मुंबई–४०० ७०५.**

------- (अर्जदार)

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखित २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे **मे शिवकमल डेव्हलपर्सचे मालक श्री. प्रकाश भिमराव बाविस्कर** यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ''ना हरकत प्रमाणपत्रासाठी'' मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करार नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| ३४५८ | ३०.०५.२०२४ | पुष्पक नोड | २८ | ४० | ३६१० पैकी ३६१ चौ.मी. | २३.०३.२०२४ | १०.०५.२०२४ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(स्वाक्षरी)
मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०४१/२०२४-२५



**महाराष्ट्र शासन**
**(रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक)**
**मार्ग प्रकल्प विभाग, महाड**
**जिल्हा रायगड ४०२३०९**
Email :- rpdmahad.ee@mahapwd.com. Ph. No 20145 222243
NOTICE INVITING e-TENDER
Notice No. 02 for 2024-25

कार्यकारी अभियंता, (रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक), मार्ग प्रकल्प विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन- ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२२४३ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या कंत्राटदारांकडुन बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड रायगड किल्ला सेल, मार्ग प्रकल्प विभाग, महाड, यांनी राखून ठेवला आहे.

| ई निविदा काम क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | किल्ले रायगडावर शिवराज्यभिषेक सोहळा साजरा करणे करिता मंडप व्यवस्था उभारणे व इतर अनुषंगिक महत्वाची कामे करणे, ता. महाड, जि. रायगड (अतिरीक्त कामे) | ५८१५४७८/- | ५९०००/- | १० दिवस | ११८०/- | वर्ग ५ व वरील |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दि. ११/०६/२०२४ (सकाळी १०.०० पासून) ते दि. १९/०६/२०२४ (१८.००) वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनव्दारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | मा. कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, महाड यांचे कार्यालयात दि. २०/०६/२०२४ वेळ १८.०० पासून |

टिप :-

परिपूर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईल निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुध्दिपत्रके तसेच इतर शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पहाता येतील.

रा.कि.सेल/माप्रवि/महाड/निविदा/२९०
दिनांक : १०.०६.२०२४

सही/-
**(महेश रा. नामदे)**
कार्यकारी अभियंता
(रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक)
मार्ग प्रकल्प विभाग, महाड जिल्हा रायगड

**विमाका/कोवि/२०२४.२०२५/०५**

# जिल्हा कारागृह 'हायटेक'

**। अलिबाग । प्रमोद जाधव ।**

**बंद्यांची वाढती संख्या, अपुरे मनुष्यबळ अशा अनेक कारणांमुळे कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण कायमच पडत आला आहे. त्यात अनेकवेळा बंद्यांच्या नातेवाईकांना बंद्यांना प्रत्यक्ष भेटणेदेखील कठीण होते. ही समस्या कायमची सोडविण्यासाठी अलिबागमधील जिल्हा कारागृहात ई-मुलाखत व अन्य सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. त्यामुळे कारागृह हायटेक होऊ लागले आहे.**




अलिबागमधील जिल्हा कारागृह ही ऐतिहासिक वास्तू आहे. गेल्या अनेक वर्षापासून या वास्तूचा वापर कारागृह म्हणून केला जात आहे. या कारागृहात सध्या १८१ बंदी आहेत. या बंद्यांच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवण्याचे काम कारागृह अधिक्षक अशोक कारकर यांच्या मार्गदर्शनाखाली तुरूंग अधिकाऱ्यांपासून सुभेदार, हवालदार आदी मंडळी करतात.

बंद्यांमध्ये मानवता निर्माण करण्याबरोबरच त्यांच्यामधील राग, द्वेष दूर करण्यासाठी कारागृहात वाचनालय सुरु करण्यात आले असून सकाळ संध्याकाळी भजनांचा कार्यक्रम घेतला जातो. दरदिवशी हे ईश्वरा सर्वांना चांगली बुध्दी दे ही विश्व प्रार्थना घेतली जाते. बंद्यांना खेळण्यासाठी कॅरमसह बुध्दीबळाचीदेखील सोय केली आहे.

बंद्यांमध्ये सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्याचा प्रयत्न कारागृहामार्फत वारंवार केला जातो. बंद्यांना चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी जिल्हा कारागृह अधिक्षक अशोक कारकर यांनी एक पाऊल पुढे टाकत काम केले आहे.

जिल्हा कारागृहामध्ये बंद्यांना भेटण्यासाठी येणाऱ्या नातेवाईकांच्या वेळ, पैशाची बचत व्हावी यासाठी ई-मुलाखत युनिट सुरू केले आहे. गेल्या दोन महिन्यांपासून हे युनिट सुरु केले आहे. त्यामुळे आता बंदी कारागृहातून घरबसल्या त्यांच्या नातेवाईकांसोबत व्हिडीओ कॉलमार्फत संपर्क साधू शकतात. नातेवाईकांची विचारपूस करण्याची व त्यांना प्रत्यक्ष बघण्याची सुविधा या युनिटमार्फत सुरू केली आहे.कारागृहातील बंद्यांना स्वत:चे कपडे धुण्यासाठी कारागृहाने वॉशिंग मशीन व कपडे सुकविण्याच्या मशीनची व्यवस्था केली आहे. त्यामुळे आता कपडे धुण्यासाठी जास्त मेहनत घेण्याची गरज निर्माण होणार नसल्याचे यावरून दिसून येत आहे.

जिल्हा कारागृहाचे कामकाज हायटेक करून बंद्यांना चांगले घडविण्याचा एक प्रयत्न यातून निर्माण केला जात आहे.

> **कारागृहात बंद्यांसाठी वेगवेगळ्या सुविधा उपलब्ध केल्या आहेत. कपडे धुण्यासाठी वॉशिंग मशीन, खेळण्यासाठी कॅरमची सोय केली आहे. बंद्यांना त्यांच्या नातेवाईकांसोबत थेट बोलता यावे यासाठी ई मुलाखत युनिट सुरु केले आहे. यातून अमूलाग्र बदल बंद्यांमध्ये निश्चितच होणार आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली ही व्यवस्था केली आहे.**
> **अशोक कारकर- जिल्हा कारागृह अधीक्षक, रायगड**

# आदिवासींना घरपोच जातीचे दाखले

**■ उरण सामाजिक संस्था, परिवर्तन सामाजिक संस्थेचा उपक्रम**

**। अलिबाग । वार्ताहर ।**

आदिवासी बांधवांच्या उन्नतीसाठी बलिदान देणारे, पाणी, जंगल व भूमीसाठी संघर्षरत, आदिवासी समाजक्रांतीचे जनक व स्वातंत्र्यसेनानी बिरसा मुंडा यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून उरण सामाजिक संस्था व परिवर्तन सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने रोहा तालुक्यात चणेरा येथील नंदप कातकरी वाडी येथे रविवारी (दि. ९) मोफत जातीचे दाखले काढण्यासाठी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.



कोकण विभागीय आयुक्त मान पी. वेलरासू, जिल्हाधिकारी रायगड किसन जावळे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव, तहसीलदार डॉ. किशोर देशमुख, नायब तहसीलदार थोरे, मंडळ अधिकारी ठाकूर, तलाठी मोरे, आदिवासी विकास निरीक्षक सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

दरम्यान, या शिबिरासाठी आदिवासी सेवक रत्नाकर घरत, दर्शना पाटील, रिया पाटील, पायल पाटील सदस्य परिवर्तन सामाजिक संस्था, अमोल शिंग्रे, सामाजिक कार्यकर्ते संजय साहू, कृषीवलचे व्यवस्थापक व जिल्हा रुग्ण कल्याण समिती सदस्य रुपेश पाटील, संदेश विचारे, शंकर दिवकर, रघुनाथ पवार, अध्यक्ष, तुलसीराम पवार, उपाध्यक्ष अंकुश वाघमारे, सचिव ट्रायबल पीपल सोसायटी यांनी मोलाचे सहकार्य केले. या कार्यक्रमास संदेश विचारे, शंकर दिवकर उपस्थित होते. उरण सामजिक संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. राजेंद्र मढवी यांनी शिबिराचे समन्वयक म्हणून काम पाहिले.

# नालेसफाईच्या कामांना जोरदार सुरुवात

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन व्हावे, यासाठी चिरनेर गावातील नालेसफाईची कामे युद्ध पातळीवर सुरू करण्यात आली असून, नाल्यातील गाळ काढण्याच्या कामास अखेर सुरुवात झाली आहे. जवळजवळ ७० ते ८० टक्के चिखल माती व प्लास्टिक कचऱ्याचा गाळ तसेच नाल्यात वाढलेली झुडपे जेसीबीच्या सहाय्याने साफ करण्याचे काम पूर्णत्वास आले आहे. त्यामुळे येथील नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.



चिरनेर ग्रामपंचायतीच्या माध्यमातून, सरपंच भास्कर मोकल, उपसरपंच सचिन घबाडी, पोलीस पाटील संजय पाटील, चिरनेर गाव तंटामुक्तीचे अध्यक्ष अलंकार परदेशी तसेच चिरनेर ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य यांच्या देखरेखेखाली, चिरनेर गावातील मुख्य आणि अंतर्गत नाल्यांमध्ये अडकलेला गाळ काढून, नाल्यांची सफाई करण्याची कामे जोरदारपणे सुरू असून लवकरच ही नालेसफाईची कामे पूर्ण करण्यात येतील. अशी माहिती संबंधित प्रशासनाकडून प्राप्त झाली आहे.

दरम्यान, मुख्य व अंतर्गत नाल्यात साठलेला चिखल मातीचा व प्लास्टिक कचऱ्याचा गाळ काढण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे, अशी माहिती सरपंच भास्कर मोकल व उपसरपंच सचिन घबाडी यांनी दिली.

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**खांब :** येत्या शैक्षणिक वर्षात शिवरामकृष्णन आयर यांच्या स्मरणार्थ १ हजार गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करणार असल्याची माहिती साई फाऊंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट मुंबईचे चेअरमन डॉ.असिफ कासकर यांनी पत्रकारांना दिली आहे. शिवरामकृष्णन आयर यांच्या स्मृतींना उजाळा मिळावा या उद्देशाने त्यांच्या परिवाराच्या वतीने व साई फाऊंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट मुंबईच्या सहयोगाने आपण हा उपक्रम राबविणार असल्याचे सांगतानाच चालू शैक्षणिक वर्षात शाळा सुरू झाल्यावर लगेचच सदरचे उद्दिष्ट पूर्ण करणार असून गरजू विद्यार्थ्यांना सदरचे शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# चौल नाक्यावरील रस्त्यात पाण्याची डबकी

**। रेवदंडा । वार्ताहर।**

चौल नाक्यावर रस्त्याच्या दुरवस्थेने पहिल्याच पावसात पाण्याची डबकी भरल्याने पायी चालत जाणारे आणि वाहनांना रस्ता शोधावा लागत होता.

अलिबाग तालुक्यातील मुरूड व रोहा तालुक्यांना मध्यवर्ती ठिकाणी असलेले चौलनाका नित्याचा रहदारीचा रस्ता आहे. मुरूड तालुका पर्यटन क्षेत्र म्हणून विकसीत झाल्यानंतर चौल नाक्यावरील वाहनांची रेलचेल मोठ्या प्रमाणात वाढली आहे.



चौलनाक्यावर वाहनांची पर्दळ कायम असते. चौल नाक्यावरील रस्त्याच्या बिकट अवस्थेने गेल्या पावसाळ्यात लहान मोठे अपघात घडून आले आहेत. यामध्ये शाळकरी विद्यार्थ्यांचा सुध्दा समावेश होता. या रस्त्याच्या दुरूस्ती व नूतनीकरणाबाबत अनेक निवेदने स्थानिकांनी सार्वजनिक बांधकाम खात्यास दिली आहेत. मात्र सार्वजनिक बांधकाम खाते दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप स्थानिक करत आहेत.

नुकताच अलिबाग ते मुरूड रस्त्याचे नूतनीकरण व दुरूस्ती करण्यात आली. मात्र या नूतनीकरण व दुरूस्तीमध्ये चौलनाक्यावरील रस्ता का वगळण्यात आला आहे असा सवाल प्रवासीवर्ग करत आहेत. यावर्षी पहिल्याच पावसात चौल नाक्यावरील दयनीय अवस्थेतील रस्त्यात पाण्याची डबकी तयार झाली आहेत. या डबक्यामध्ये पाणी असल्याने रस्त्यातील खड्ड्याचा अंदाज वाहन चालकांना घेता येत नाही.

विशेषतः येथून प्रवास करताना रिक्षा, मोटर सायकलस्वार, सायकल स्वार यांना फारच कसरत करावी लागते. अनेकदा रस्त्यातील खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने छोट्या वाहनांचा अपघात घडून येत आहे.

सातत्याने या रस्त्याच्या दयनीय अवस्थेबाबत अनेक तक्रारी व निवेदने देण्यात आली असताना संबधीत विभाग दुर्लक्ष का करते असा सवाल स्थानिक करत आहेत.

## हनुमंत पवार यांचे निधन

**। माथेरान । वार्ताहर।**



माथेरान मधील चर्मकार समाजाचे ज्येष्ठ सदस्य हनुमंत बाळकृष्ण पवार यांचे ८ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. उद्योजक वैभव पवार आणि माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेचे माजी सभापती हेमंत पवार यांचे ते वडील होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# हातरिक्षा चालक बनले ई-रिक्षा चालक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरानमध्ये हातरिक्षा चालक यांना ई-रिक्षा चालविण्यास मिळावी आणि अमानवी प्रथेतून त्यांची मुक्तता व्हावी म्हणून एक तप न्यायालयीन लढा लढला गेला. त्या लढ्याला यश आले असून आजपासून २० हातरिक्षा चालक यांच्या हातात पर्यावरणपूरक ई -रिक्षा आल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने माथेरानमध्ये पर्यावरण पूरक ई-रिक्षा यांचा पायलट प्रकल्प सुरू असून त्यात आता हातरिक्षा चालक यांच्याकडे सारथ्य देण्यात आले आहे.



माथेरान नगरपरिषदेने निविदा प्रक्रिया पूर्ण करून पहिल्या टप्प्यातील २० रिक्षा चालक ठरविण्यासाठी निविदा प्रक्रिया आणि नंतर सोडत काढली. त्यानुसार पायलट प्रकल्पात २० रिक्षा चालविण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे.त्या २० रिक्षा चालक यांनी नवीन ई-रिक्षा कर्ज काढून खरेदी केल्या आहेत. माथेरान येथील हुतात्मा भाई कोतवाल स्मारक येथे असलेल्या कम्युनिटी सेंटर मध्ये लोकार्पण सोहळा पार पडला. त्यावेळी माथेरान नगरपरिषद मुख्याधिकारी राहील इंगळे तसेच श्रमिक रिक्षा संघटनेचे अध्यक्ष प्रकाश सुतार, सचिव सुनील शिंदे, खजिनदार शकील पटेल तसेच रिक्षा चालक उपस्थित होते.

आता यापुढे माथेरान शहरात २० ई-रिक्षा यांचा पायलट प्रकल्प सुरू झाला असून आज पासून १७ ई-रिक्षा प्रवाशांच्या सेवेत रुजू झाल्या आहेत. त्यात तीन ई-रिक्षा या अद्याप माथेरानमध्ये आलेल्या नसून त्यातील दोन ई-रिक्षा यांचे अर्थ सहाय प्रक्रिया बँकेकडून पूर्ण झालेली नाही.या सर्व रिक्षा यांचा समावेश ई-रिक्षाचे पायलट प्रकल्पामध्ये समाविष्ट करण्याचा सोहळा पार पडला.

# आदर्श पतसंस्थेकडून रक्तदान शिबीर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील यांच्या ७२ व्या वाढदिवसानिमित्त अलिबागमधील आदर्श भवन येथे शनिवारी (दि. ८) रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला असून ५५हून अधिक बाटल्या रक्त संकलन करण्यात आले.



यावेळी आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील, संचालक सतीश प्रधान, संचालक अनंत म्हात्रे, ॲड. वर्षा शेठ, विलाप सरतांडेल, जगदीश पाटील सुरेश गावंड, रामभाऊ गोरीवले, ॲड. रेश्मा पाटील, महेश चव्हाण , शाखा सल्लागार श्री विजय पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी मीनाक्षी पाटील आदींसह कर्मचारी उपस्थित होते.

दरवर्षी वर्षातून दोन वेळा संस्थेमार्फत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते, या शिबिरामधे संकलन झालेले रक्ताचे कार्डस संस्थेमध्ये जमा केली जातात. गरजू रुग्णांना आदर्श मार्फत त्या कार्डसचे वाटप करण्यात येते. गेली २० वर्षे संस्था हा उपक्रम राबवित आहे. आजपर्यंत जवळपास १५०० ते १७०० रुग्णांना मोफत रक्त पुरवठा या माध्यमातून करण्यात आला. या शिबिराचे आयोजन करण्यासाठी संपूर्ण आदर्श परिवाराचे मोठे योगदान आहे अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी दिली.

# संसर्गजन्य आजार रोखण्यासाठी यंत्रणा सज्ज

**। महाड । वार्ताहर ।**

महाड दुर्गम व डोंगराळ तालुका असल्याने या ठिकाणी नेहमीच नैसर्गिक आपत्ती घडतात. पावसाळ्यात लेप्टोस्पायरोसिस, गॅस्ट्रो, कावीळ, कॉलरा, टायफॉईड, डेंग्यू, मलेरिया, सर्दी-ताप आदी संसर्गजन्य आजार बळावण्याची शक्यता असते. नैसर्गिक आपत्तीमध्ये आपदग्रस्तांना तातडीने वैद्यकीय सुविधा मिळाव्यात, यासाठी आरोग्य विभागाकडून नियोजन करण्यात आले आहे.

महाड तालुक्यामध्ये वरंध, बिरवाडी, दासगाव, पाचाड, चिंभावे व विन्हेरे अशी सहा प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. तर तालुक्याच्या ठिकाणी ग्रामीण रुग्णालय आहे. महाड तालुका आरोग्य विभागाकडून प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रनिहाय वैद्यकीय पथके स्थापन करण्यात आली आहेत. साथरोग नियंत्रणासाठी आवश्यक औषधसाठा उपलब्ध आहे. प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये संभाव्य साथीचे आजार तसेच आपत्ती काळामध्ये लागणारे वैद्यकीय सहाय्य गृहीत धरून वैद्यकीय कीट तयार करण्यात आले आहेत. त्यामुळे गरजेच्या ठिकाणी तातडीने वैद्यकीय सुविधा पुरवणे शक्य होणार आहे.पावसाळ्यात अनेक आजार दूषित पाण्यामुळे होतात. त्यामुळे प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये असणारे पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत येथील पाणी टीसीएल पावडर टाकून शुद्ध करण्याच्या सूचना ग्रामपंचायतीला देण्यात आल्या आहेत.

ग्रामपंचायत स्तरावर पिण्याच्या पाण्याचे नमुने वेळोवेळी तपासणीसाठी पाठवले जात आहेत. दूषित पाणी शुद्धीकरणासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येणार आहेत. गावपातळीवर पिण्याच्या पाण्याची जास्त साठवणूक करू नये तसेच पाणी साठवलेली भांडीही दोन-चार दिवसाआड स्वच्छ करावी, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. महाड तालुक्यातील प्रत्येक आरोग्य केंद्रामध्ये पुरेसे वैद्यकीय अधिकारी, औषधसाठा व कर्मचारीही उपलब्ध असल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले आहे.

## राजेंद्र पाटील राष्ट्रीय सल्लागार

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

मराठा क्रांती स्वराज्य संघटनेच्या राष्ट्रीय सल्लागारपदी राजेंद्र पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मराठा क्रांती स्वराज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सदानंद राव भोसले, अध्यक्ष विजयराव कदम आणि सरचिटणीस प्रदीप मोरे यांच्या सूचनेनुसार राष्ट्रीय कार्याध्यक्ष गजानन साळुंखे यांनी निवड केली आहे. उरण मतदारसंघात लोकप्रिय जननायक म्हणून सुपरिचित आहेत. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये संचालक म्हणून अधिकृत निवडून आलेले आहेत.

# पनवेल आयुक्तांचा विविध कामांचा आढावा

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल महापालिकेच्या आयुक्तपदाची सुत्रे मंगेश चितळे यांनी चार दिवसांपूर्वी हाती घेतल्यानंतर कामाच्या नियोजनाच्या बैठकांचे सत्र महापालिकेत सुरु आहे. यामध्ये पावसाळ्यापूर्वी कामाचा आढावा, महावितरण, आयआरबी, सार्वजनिक बांधकाम विभाग अशा विविध प्राधिकरणांच्या अधिकाऱ्यांसोबत, तसेच भविष्यातील विकासाची घडी बसविण्यासाठी महापालिका प्रशासनाने हाती घेतलेल्या प्रकल्पांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी बैठकांचे सत्र पालिकेत सध्या जोरदार सुरु आहे. आयुक्त चितळे यांना पनवेल शहरातील पिण्याच्या पाण्यासारखा आणि इतर पायाभूत सुविधांचे प्रश्न मार्गी लावण्यासोबत पालिकेची सुरु असलेली विकासकामे वेगाने कशी करता येतील असे आव्हान आयुक्त चितळे यांच्यासमोर आहे.

शनिवार हा सुट्टीचा दिवस असला तरी आयुक्त चितळे यांनी पालिका उपायुक्त आणि अभियंत्यांसोबत पावसाळ्यापूर्वी सुरु असलेल्या नालेसफाईची पाहणी दौरा केला. स्थानिक अधिकाऱ्यांना न सांगता हा दौरा अचानक पालिका क्षेत्रातील चारही प्रभागांमध्ये घेण्यात आला. तसेच अतिवृष्टीत आपत्ती ओढावू नये यासाठी पावसाळ्यापूर्वी केलेल्या कामांच्या आणि आपत्ती व्यवस्थापनाचा आढाव्यासाठी पालिकेचा पदभार घेतलेल्या दिवशीच बैठक बोलावण्यात आली. या बैठकीमध्ये पालिका क्षेत्रात जिल्हापरिषदेच्या शाळांच्या २९ शाळा अतिधोकादायक तर २७ शाळा तातडीने दुरूस्ती करणे आवश्यक असल्याने शाळा सुरू होण्यापूर्वी अतिधोकादायक शाळेच्या इमारतीचे पाडकाम करुन इमारतीची दुरुस्ती सुचविलेल्या शाळांची किरकोळ दुरूस्ती तातडीने करण्याची सूचना पंचायत समितीच्या विस्तार अधिकाऱ्यांना आयुक्तांनी दिली.

महामार्गावरील ओएनजीसी पुलाखाली पाणी साचण्याची दरवर्षांची समस्या आहे. तेथे पाणी निचरा होण्यासाठी पालिकेने व इतर प्रशासकीय विभागांसोबत समन्वय साधून उपाययोजना करण्याचे आदेश आयुक्त चितळे यांनी दिले. याच मार्गिकेवर वेलकम हॉटेल येथे मोठ्या प्रमाणात पाणी तुंबुन राहत असल्याने एमएसआरडीसीला सुद्धा लेखीपत्र देऊन कळविण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. दुसऱ्या दिवशी आपत्ती व्यवस्थापनाच्या आढावा बैठकीत पालिका हद्दीतील ७९ धोकादायक इमारती असून यापैकी ४० इमारती रिक्त करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांकडून आयुक्तांना देण्यात आली.

# सृष्टीला लागली पावसाची ओढ

**। पाली । वार्ताहर ।**

**यंदा महाराष्ट्रात वेळेत मान्सूनचे आगमन होत आहे. त्याआधी अनेक ठिकाणी वळवाचा पाऊस देखील पडला. यामुळे सजीव सृष्टी जणू काही न्हाऊन निघाली. विशेष म्हणजे निसर्गातील विविध पक्षी, मासे, कीटक व प्राणी यांना पावसाच्या लवकर आगमनाची चाहूल लागली आहे. संपूर्ण सृष्टीला जणू काही पावसाची ओढ लागली आहे. पावसाचे अल्हाददायक वातावरण देखील सर्वत्र निर्माण होत आहे. सीकाडा कीटकाच्या ओरडण्याचा आवाज जंगलात गुंजत आहे.**

बहुसंख्य पक्षांची घरटी बांधून पूर्ण झाली आहेत. अनेक माशांच्या पोटात अंडी सापडत आहेत. मुंग्यांनी आधीच रसद गोळा करून ठेवली आहे. तर वाळवीची घरांची (वारुळाची) दुरुस्ती पूर्ण झालेली आहे. कोळ्यांची जाळी बनवून पूर्ण झाली आहेत. रायगड जिल्ह्यातील काही पर्यावरण व निसर्ग अभ्यासकांनी या नोंदी नोंदविल्या आहेत. पावसापूर्वीची सर्व लगबग कामे आटोपून जणूकाही हे पशुपक्षी व कीटक आतुरतेने पावसाची वाट पाहत आहेत.



कोलाड येथील पर्यावरण व निसर्ग अभ्यासक सागर दहिंबेकर यांनी सांगितले की निसर्गामध्ये पाऊस येण्याची चाहूल लागली आहे. अनेक जण पाऊस येण्याच्या प्रतीक्षेत असतात. शेतकरी पावसाची प्रकर्षाने वाट पाहत असतो. असंच काहीसं निसर्गातील जीव हे पावसाची वाट पाहत असतात. प्राण्यांमध्ये काही प्राणी निसर्गातील नैसर्गिक बदल समजू शकतात. निसर्गामध्ये मान्सून येण्यापूर्वीची लगबग पाहायला मिळत आहे. पावसाळ्यामधील पहिला पाऊस पडण्याआधी साधारण २० ते २५ दिवस आधी कावळा जातीचा पक्षी हे आपले घरटे बांधण्यास सुरुवात करतो. ज्यावेळेस कावळा आजूबाजूच्या परिसरात छोट्या काट्या, तारीचे तुकडे अशा वस्तू गोळा करण्यास सुरुवात करतो त्यावरून आपण अंदाज घेऊ शकतो की २० ते २५ दिवसात पावसाची सुरुवात होणार आहे.

तशी परिस्थिती पाहायला मिळत आहे. त्याच प्रकारे माशांमध्ये साधारणपणे पाऊस सुरू होण्याच्या १० ते १५ दिवस अगोदर मादी माशाच्या पोटामध्ये अंडी बनण्यास सुरुवात झाली आहे.

PPiNE
PRABHAKAR PATIL INSTITUTE OF NURSING EDUCATION
DHANVANTARY MEDICAL EDUCATION SOCIETY PEN'S
PEN
ANM-NUR1004/CR-241/04/EDU-1
GNM-NUR1304/CR-242/04/EDU-1

ए.एन.एम.(२वर्षे)/ जी.एन.एम.(३वर्षे) नर्सींग कोर्ससाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ॲडमिशन सुरु......

धन्वंतरी मेडिकल एज्युकेशन सोसायटी पेण संचलित

प्रभाकर पाटील
इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन

मान्यताप्राप्त -
- भारतीय परिचर्या परिषद नवी दिल्ली
- महाराष्ट्र परिचर्या परिषद मुंबई
- महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व पॅरावैद्यक शिक्षण मंडळ मुंबई आणि महाराष्ट्र राज्य

- प्रवेश पात्रता -
१२ वी-आर्टस्/कॉमर्स/सायन्स,
एमएच-नर्सींग सीईटी
आवश्यक नाही

प्रवेश संपर्क - ७९७२३२२३७३ / ८७६७६४९००३

# दणक्याचे प्रतिबिंब

लोकसभा निवडणुकीत बसलेल्या दणक्याचे पुरेपूर प्रतिबिंब नरेंद्र मोदींच्या नव्या मंत्रिमंडळात पडलेले दिसते. जुन्या मंत्र्यांपैकी ३७ जणांना वगळले असले तरी मोक्याच्या मंत्रिपदावरचे सर्व जण पुन्हा परतले आहेत. तब्बल दहा दलित आणि पाच आदिवासींना यात स्थान आहे. सुमारे २७ ओबीसी चेहरे यात आहेत. दक्षिणेतील राज्यांतील राजकारणाचे हिशेब ध्यानात घेऊन शेलक्या लोकांना स्थान देण्यात आले आहे. पंजाबात व केरळध्ये संसदेचे सदस्य नसूनही प्रत्येकी एकाला मंत्रिपद दिले गेले आहे. २०१९ मध्ये भाजप ३०३ जागांवर निवडून आल्याने एनडीएतील इतर पक्षांना किरकोळ स्थान दिले गेले होते. यावेळीही तब्बल ६१ भाजपचे मंत्री आहेत. अकरा सहयोगी पक्षांच्या नेत्यांना घ्यावे लागले आहे. पूर्वी केवळ चार पक्षांच्या लोकांचा समावेश होता. तेलुगु देसम व नीतीश यांच्या जनता दलाला कॅबिनेट मंत्रिपद द्यावे लागले आहे. २०१४ मध्ये केवळ ४५ जणांचे छोटे मंत्रिमंडळ करण्यात आले होते. अकेला मोदी सरकार चलाने को काफी है अशी भावना तेव्हा होती. त्यावेळी मंत्र्यांनी पोषाख कुठला करावा, कसे वागावे, दौरे कसे करावेत याच्या सूचना पंतप्रधानांच्या कार्यालयातून जात असत. त्यांच्या मुद्दाम बातम्या पसरवल्या जात असत. २०१९ ला भाजपच्या अधिक जागा जिंकून आल्या तरीही मंत्रिमंडळाची संख्या ५७वर नेण्यात आली. यंदा भाजपला बहुमताइतक्या देखील जागा मिळाल्या नाहीत. त्यासरशी मोदींचा सर्व तोरा उतरला. आता भाजपसोबत एनडीएतील इतर पक्षही आहेत याची आठवण झाली. इतके दिवस भाजप तर सोडाच केंद्रातील सरकारला मोदी सरकार म्हटले जात असे. मोदीदेखील मोदी की गॅरंटी, मोदी ने ऐसा किया असे सांगून मोदी या नावाभोवतीच सर्व काही फिरत राहील अशी व्यवस्था करीत होते. यावेळी तो माज कमी झाला आहे. उत्तर प्रदेश आणि हिंदी प्रदेशाचा गेल्या वेळी खूप वरचष्मा होता. आता मात्र इतर प्रांतांनाही स्थान द्यावे लागले आहे.

### राष्ट्रवादीला जागा दाखवली

बंगालमधील मटुआ समाज (शांतनु ठाकूर), मध्य प्रदेशातील आदिवासी (सावित्री ठाकूर), बिहारमधील दलित ( मांझी, पासवान), केरळातील ख्रिश्चन (जॉर्ज कुरियन) अशांना यात मुद्दाम स्थान आहे. आंध्र प्रदेश व तेलंगणात तेलुगु देसमच्या जोडीनेच भाजपच्या नेत्यांचा समावेश करण्यात आला आहे. अनेक राज्यांचे माजी मुख्यमंत्री व भाजपचे प्रदेशाध्यक्ष यांची वर्णी लावण्यात आली आहे. शिवराजसिंह चौहान यांना मध्य प्रदेशात मुख्यमंत्री होऊ दिले गेले नाही. मात्र त्यांना टाळणे अशक्य बनल्यामुळे कॅबिनेट मंत्री केले आहे. महाराष्ट्रात भाजपच्या केवळ नऊ जागा असल्याने निवड करायला वाव मर्यादित होता. नितीन गडकरी यांचा समावेश गृहित होता. रक्षा खडसे यांची वर्णी लागणे हा भाजपवाल्यांनाच काहीसा धक्का आहे. त्यांना उमेदवारी द्यायला गिरीश महाजन व स्थानिक नेत्यांचा विरोध होता. त्यांचे सासरे एकनाथ खडसे भाजपमध्ये परतल्यामुळेच रक्षा यांना विजय मिळाला. मात्र नाथाभाऊंचा भाजपप्रवेश देवेंद्र आणि मंडळींनी लटकावून ठेवला आहे. त्यांना हा चांगलाच फटका म्हणायला हवा. मुरलीधर मोहोळ यांना मंत्रिपद देऊन देवेंद्र फडणवीस तसेच पुणे, पश्चिम महाराष्ट्र व मराठा समाजाला चुचकारलेले दिसते. रावसाहेब दानवे हरल्यामुळे मोहोळ यांची लॉटरी लागली. शिंदे गटाच्या प्रतापराव जाधव यांना संधी देऊन मराठ्यांना आणखी एक मंत्रिपद दिले गेले आहे. यंदा दलितांचा मतदानात व्यक्त झालेला राग रामदास आठवलेंना उपकारक ठरलेला दिसतो. अजितदादांच्या राष्ट्रवादीला मात्र भाजपने त्यांची जागा दाखवून दिलेली दिसते. वास्तविक एक किंवा दोन खासदार निवडून आलेल्या पक्षाच्या जीतनराम मांझी किंवा कुमारस्वामी यांना कॅबिनेट मंत्रिपद दिले गेले आहे. पण प्रफुल्ल पटेल यांना मात्र संख्येचे कारण सांगून राज्यमंत्रिपद दिले गेले. यंदाच्या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादीचे पानिपत झाले. आगामी विधानसभांमध्ये दादा गटाचा फार उपयोग होणार नाही असाच निष्कर्ष भाजपने काढलेला दिसतो.

### बदल, पण थोडेच

श्रीकांत शिंदे यांना मंत्रिपद देण्यास भाजपनेच नकार दिला व नंतर त्यांनी माघार घेतल्याचे नाटक करण्यात आले. शिंदे गटाला एनडीतील तिसऱ्या क्रमांकाच्या सात जागा असूनही केवळ राज्यमंत्रिपद दिले गेले आहे. शिंदे गट फार शिरजोर होऊ नये याची ही तजवीज आहे. नारायण राणे यांना पुढे करून भाजप सिंधुदुर्गात घुसला आहे. पण त्यांना मंत्रिपदावरून मात्र हाकलले. मराठवाड्यात भागवत कराड या वंजारी समाजाच्या प्रतिनिधीला न घेणे मात्र आश्चर्यकारक आहे. भाजपचे पुढचे लक्ष्य दक्षिणेतील राज्ये असतील हे मात्र या मंत्रिमंडळातून स्पष्ट झाले. तामिळनाडूचे पूर्वीचे प्रदेशाध्यक्ष आणि आताच्या लोकसभेत पराभूत झालेले मुरुगन यांना मंत्री करण्यात आले आहे. तेलंगणातील संजय बंडी हे त्यांचे आक्रस्ताळे खासदार व माजी प्रदेशाध्यक्ष मंत्री झाले आहेत. कर्नाटकात शोभा करंदालजे यांना मंत्री करून येडियुरप्पा यांची शांती करण्यात आली आहे. प्रल्हाद जोशी हे हुबळा-धारवाडचे ब्राह्मण घेऊन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या चेहऱ्याला स्थान आहे. ज्याला त्याला पाकिस्तानात जायला सांगणारे गिरीराज सिंह यांनाही कायम ठेवले आहे. गेल्या वेळी सतत मिडियापुढे असणारे अनुराग ठाकूर आणि स्मृती इराणी यांना मात्र वगळले आहे. मनेका गांधी पराभूत झाल्याने त्यांचाही पत्ता आपोआप कट झाला आहे. हरियानात एकूण खासदार आहेत दहा. त्यातील पाच जणांना मंत्रिपदे मिळाली आहेत. त्यातही एक मनोहरलाल खट्टर हे माजी मुख्यमंत्री व मोदींचे संघबंधू आहेत. हरियाणात भाजपने यंदा मार खाल्ल्याने हे रफूकाम केलेले आहे. गेल्या वेळप्रमाणे याही वेळी मोदी यांनी मंत्र्यांना भरपूर काम करण्याचा उपदेश केला आहे. शपथविधीला यंदाही बऱ्याच शेजारी देशांच्या राष्ट्रप्रमुखांना बोलावले होते. मात्र त्यांना ७२ मंत्री शपथ घेताना पाहायला लावणे हे हास्यास्पद आणि मूर्खपणाचे होते. स्वतःला सम्राट समजणे हा मोदींचा आजार अजूनही बरा झालेला नसल्याचे हे चिन्ह आहे.

विचार

# एकीकडे झटका, दुसरीकडे इतिहास!

***अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीममधील निवडणुकांचे निकाल काँग्रेसला अडचणीत आणणारे ठरले. अरुणाचलमध्ये जनतेने नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळाचे आणि पेमा खांडू सरकारच्या आठ वर्षांच्या कार्याचे मूल्यम ापन करून मतदान केले, असे जाणवते. जनमताचा हा कौल बोलका आहे. मात्र त्याच वेळी सिक्कीममध्ये भाजपाला एकही जागा मिळालेली नाही. तिथे स्थानिक पक्षाने सत्ता पटकावली. या दोन निकालांचा अन्वयार्थ.***

**अजय तिवारी**

लोकसभा निवडणुकीबरोबरच अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम या दोन राज्यांमध्ये विधानसभेच्या निवडणुका झाल्या. नुकतेच जाहीर झालेले त्यांचे निकाल काँग्रेसला धक्का देणारे आहेत, असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. इथे तीस वर्ष राज्य करणाऱ्या पक्षाचा नेता सर्व आमदार घेऊन भाजपमध्ये जातो आणि त्यानंतर सलग दुसऱ्यांदा सत्ता मिळवतो, यावरूनच काँग्रेसला नेते आणि आमदार सांभाळता येत नसल्याचे प्रत्ययाला येते. अरुणाचल प्रदेश हे चीनला लागून असणारे राज्य सामरिक दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा राज्यात दोन तृतियांश बहुमताने स्थिर सरकार येणे अधिक महत्त्वपूर्ण म्हणायला हवे. येथे काँग्रेसला सर्व साठ जागांवर उमेदवारही मिळाले नाहीत. खेरीज उमेदवारी मिळवणाऱ्या काही काँग्रेसजनांनीही नंतर भाजपशी हातमिळवणी केली. उमेदवारी जाहीर होऊनही त्यांनी अर्ज भरले नाहीत. परिणामस्वरुप तब्बल तीस वर्षे एकहाती सत्ता असणाऱ्या अरुणाचल प्रदेशमध्ये काँग्रेसला अवघ्या १९ जागी उमेदवार उभे करता यावेत आणि त्यातही एकच विजयी व्हावा, यासारखी दुसरी नामुष्की नाही.

अरुणाचल प्रदेशच्या इतिहासात प्रथमच विद्यमान सरकार पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करून पुन्हा सत्तेवर आले आहे. त्याचे महत्त्वही अधिक आहे कारण म तदार भाजपचे मूल्यमापन त्यांच्या विचारसरणीनुसारच करत नव्हते तर, सरकारने केलेल्या विकासकाम ांवरही मान्यतेचा शिक्का मारत होते. १९ एप्रिल रोजी अरुणाचल प्रदेशमधील जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दशकभराच्या कार्यकाळाचे आणि मुख्यमंत्री पेमा खांडू यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या आठ वर्षांच्या कार्यकाळाचे मूल्यमापन करून मतदान केले. एके काळी पंतप्रधान आणि केंद्रीय मंत्र्यांच्या अरुणाचल प्रदेशच्या भेटी हा चर्चेचा विषय असायचा. पण आज या भेटी वारंवार होत आहेत. मोदी यांनी सर्व पूर्वसुरींच्या तुलनेत ईशान्येला सर्वाधिक वेळा भेट दिली आहे. भारतासाठी सांस्कृतिक आणि धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या असणाऱ्या या प्रदेशात भाजपने नेहमीच 'डबल इंजिन'च्या सरकारचे महत्त्व पटवून देण्यास प्राधान्य दिल्याचे दिसते. यावरून केंद्रात आणि राज्यात संबंधित नेत्यांची लोकप्रियता कायम असल्याचे दिसून येते.

दरम्यानच्या काळात या भागातील दळणवळण यंत्रणा आणि पायाभूत सुविधांमध्ये महत्त्वपूर्ण बदल झालेले दिसले. राजधानी इटानगरमधील डोनी पोलो विमानतळाचे उद्घाटन झाल्यानंतर राज्यापासून दिल्लीचे अंतर अवघ्या तीन तासांचे झाले. राज्याच्या राजधानीतील विमानतळ ही स्पष्ट गरज असताना, देशाच्या या दुर्गम भागात विमानतळ बांधण्यासाठी तब्बल ७५ वर्षे का लागली, याचाही विचार लोकांनी केला. कारण असे प्रकल्प केवळ पायाभूत सुविधांबाबत नसतात तर आकांक्षा आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक मानले जातात. या अर्थाने अरुणाचलमधील भाजपचा विजय स्थिरता आणि सौहार्द वाढवणाऱ्या नेतृत्वाचे प्रतीक ठरला, असेही म्हणता येईल.

अरुणाचल प्रदेशमध्ये २६ प्रमुख जमाती तर शंभर उप-जमाती आहेत. प्रत्येकाची संस्कृती, भाषा आणि चालीरीती अद्वितीय आहे. अशा या १४ लाख लोकसंख्या असणाऱ्या राज्यात जनतेने पुन्हा एकदा सत्ताधारी भाजपवर विश्वास व्यक्त करणे ही मोठी बाब म्हणावी लागेल. अशा गुंतागुंतीच्या प्रशासनाला भेदभाव न करता काम करणाऱ्या सर्वसमावेशक नेत्यांची गरज असते. त्यात भाजपचे पेमा खांडू स्वतःला सिद्ध करण्यात यशस्वी झाले आहेत. केंद्र सरकारकडून दिल्या जाणाऱ्या सुविधांच्या अंमलबजावणीमध्ये शेवटच्या घटकाला फायदा होईल, हे पाहणे आवश्यक असते. लाभ अपेक्षित लाभार्थीपर्यंत पोहोचतील याची खात्री करण्यासाठी राज्य सरकारे महत्त्वाची भूमिका बजावतात. अरुणाचल प्रदेश सरकार याबाबत सक्रिय राहिले. याचे उदाहरण म्हणजे जल जीवन मिशन. अरुणाचल हे १०० टक्के संपृक्तता प्राप्त करणारे पहिले राज्य ठरले. १५ ऑगस्ट २०१९ रोजी अरुणाचल प्रदेशमध्ये फक्त २२ हजार ७९६ कुटुंबांकडे नळ जोडणी होती. आता ही संख्या दोन लाख २८ हजार ५४६ पर्यंत वाढली आहे. राज्यातील दुर्गम भूभाग लक्षात घेता हे यश अभूतपूर्व आहे. पूर्वीच्या अत्यल्प विकासस्थितीच्या विपरीत अरुणाचलमध्ये आता वेगवान आणि सक्रिय दृष्टिकोन दिसत आहे. राज्याने तीन लाखांहून अधिक घरांना वीज पुरवली आहे. पीएम आवास योजनेअंतर्गत ३५ हजारांहून अधिक घरे बांधण्यात आली आहेत. दोन हजार नऊशेपेक्षा अधिक स्वयंसहाय्यता गटांना बळकट केले आहे. त्यातून गरीब लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. राज्यात पहिले वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाले आहे. गावे आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांना इंटरनेट सुविधा पुरवण्यासाठी फोर जी मोबाइल टॉवर स्थापित केले गेले आहेत आणि एकूण रस्त्यांच्या पायाभूत सुविधांमध्ये ६४ टक्के वाढ झाली आहे. या सर्व घडामोडी एका दशकापेक्षा कमी कालावधीत बघायला मिळाल्या आहेत. ईशान्येकडील राज्यांमधील जनता केंद्रात सत्तेवर असलेल्यांनाच मत देते, असे म्हणणे म्हणजे वरवरचे विश्लेषण ठरेल. या राज्यात महाराष्ट्रातील अजित पवार गटाने खाते उघडले आहे. त्यांचे तीन आमदार विजयी झाले तर एक उमेदवार अवघ्या दोन मतांनी पराभूत झाला. अन्य एक दोनशे मतांनी पराभूत झाला. त्यामुळेच आता राष्ट्रीय पक्ष असल्याचा दावा करण्यासाठी अजितदादा पुढे सरसावू शकतील. त्यातही अजितदादांच्या एका उम ेदवाराने भाजपच्या दिग्गज नेत्याचा पराभव करण्याची बाब लक्षवेधी म्हणावी लागेल.

सिक्कीममध्ये भारतीय जनता पक्षाने विधानसभेच्या ३१ जागांवर निवडणूक लढवली. पण त्यांना एकही जागा जिंकता आली नाही. एकीकडे संपूर्ण देशात भाजपची लाट असल्याची चर्चा आहे. दुसरीकडे सिक्कीममध्ये भाजपला पराभवाला सामोरे जावे लागले. मावळत्या विधानसभेत भाजपचे १२ सदस्य होते. सिक्कीम क्रांतीकारी मोर्चाने ३२ पैकी ३१ जागा जिंकून सत्ता राखली. पाच वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या या पक्षाने दुसऱ्यांदा सत्ता मिळवली. भाजपला राज्यात केवळ ५.१८ टक्के मते मिळाली. सिक्कीम क्रांतीकारी मोर्चाला ५८.३८ टक्के मते मिळाली तर 'सिक्कीम डेमोक्रॅटिक फ्रंट'ला २७.३७ टक्के मते मिळाली.


या निकालांवरून सिक्कीममध्ये भाजपची कामगिरी किती वाईट होती याची कल्पना येते. सिक्कीम भाजपचे अध्यक्ष दिली राम थापा यांना अप्पर बुर्टुक विधानसभा मतदारसंघात सिक्कीम क्रांतीकारी मोर्चाचे उमेदवार कला राय यांच्याकडून पराभव पत्करावा लागला. लचेन मंगण जागा वगळता भाजपने ३१ जागांवर निवडणूक लढवली पण बहुतांश जागांवर भाजप उमेदवारांची अनामत रक्कमही जप्त झाली. मुख्यमंत्री प्रेमसिंग तमांग यांच्या नेतृत्वाखालील सिक्कीम क्रांतीकारी मोर्चासोबतची युती तोडून भाजपने एकट्याने निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला होता. एकट्याने निवडणूक लढवल्याने भाजपचे नुकसान होणे साहजिक आहे. मागच्या विधानसभेत भाजपचे बारा आमदार होते. त्यापैकी दहा विरोधी सिक्कीम डेमोक्रॅटिक फ्रंटमधून आले होते. त्यापैकी पाच आमदारांनी पक्ष सोडला. पैकी तिघेजण सिक्कीम क्रांतीकारी मोर्चामध्ये सामील झाले. भाजपच्या उर्वरित सात आमदारांपैकी केवळ दोघांनाच तिकीट मिळाले. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपर्यंत भारतीय जनता पक्षाचे सिक्कीममधील निवडणूक ट्रॅक रेकॉर्ड खूपच खराब राहिले. १९९४ मध्ये भाजपने सिक्कीमच्या निवडणुकीच्या राजकारणात प्रवेश करत तीन जागांवर निवडणूक लढवली पण तिन्ही जागांवर अनामत रक्कम जप्त झाली.

या निवडणुकीत सिक्कीमच्या अस्मितेचा मुद्दा म हत्त्वाचा होता. या वेळच्या निवडणुका ही स्थानिकांच्या आत्म्याची लढाई आहे, असे सिक्कीम क्रांतीकारी म ोर्चाने राज्यभर ठामपणे सांगितले. 'सिक्कीम डेमोक्रॅटिक फ्रंट' च्या फुटीरतावादी राजकारणावर लोक नाराज होते आणि त्याचे परिणाम त्यांना २०१९ मध्ये भोगावे लागले. आताही तेच झाले. त्यातही सध्या विविध विषयांवरुन बहुतांश प्रादेशिक पक्षांमध्ये नाराजी आहे. त्यातील एक म्हणजे वित्त कायदा, २०२३ मधील नवीन व्याख्येनुसार सिक्कीममध्ये १९७५ पर्यंत राहणाऱ्या जुन्या रहिवाशांच्या वंशजांचा समावेश सिक्कीमी स्थानिकांम ध्ये करण्यात आला आहे. त्यात 'सिक्किमी' कोणाला म्हणावे, यासंबंधीची व्याख्या स्थानिक लेपचा, भुतिया आणि नेपाळी लोकांच्या पलीकडे विस्तारली. यासोबतच जुन्या रहिवाशांच्या वंशजांना प्राप्तिकर सवलतीचा लाभ देण्यासाठी पाऊल उचलल्याचा युक्तिवाद भाजपने केला.

या निवडणुकीपूर्वी सिक्कीममध्ये तरुणांना सरकारी नोकऱ्या देण्यात आल्या होत्या. सरकारी योजनांचाही राज्यात मोठा प्रभाव होता. सिक्कीममध्ये मुख्यमंत्री आवास योजनेंतर्गत अनेकांना घरे देण्यात आली. त्यामुळेही जनतेमध्ये सकारात्मक संदेश गेला. निवडणुकीमध्ये 'सिक्कीम डेमोक्रॅटिक फ्रंट'ने सत्ताधारी सिक्कीम क्रांतीकारी मोर्चावर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. पण याचा नगण्य परिणाम झाला आणि जनतेने सिक्कीम क्रांतीकारी मोर्चावरच विश्वास व्यक्त केला. जनमताचा हा कौलही दखलपात्र आहे.

आजकाल

# कंगनाला थप्पड प्रकरणाच्या निमित्ताने



**नीरज हातेकर**

कंगना प्रकरणात साधारण पणे भाजप समर्थक आणि विरोधक असे तट आहेत. ते आपली राजकीय लढाई इथे पण लढत आहेत.

मुळात कंगना ह्या व्यक्ती बाबत काय झाले हे गौण आहे. कंगना हि काही विचारपूर्वक वगैरे मांडणी करत नाही. ती बरळते. कधी गांधीजी, कधी आंदोलन करणाऱ्या महिला. सार्वजनिक जीवनात ह्याचा परिणाम म्हणजे कधी तरी कानाखाली वाजते ह्याचे भान तिला कदाचित आले असेल. तिला सहानभूती वगैरे मिळण्याची गरज नाही. तीची कानशिले गरम करणाऱ्या पोरीचे सुद्धा समर्थन करण्याचे काहीच कारण नाही. हा काही वगैरे नाही. विचारपूर्वक असतो. सर्जनशील असतो. ह्या मुलीने जे काही केले ते आपल्या पितृसत्ताक, समाजाला साजेसे कृत्य आहे. दोन्ही व्यक्ती फार दाखल घेण्या सारख्या नाहीत. अर्थात ह्या घटनेचे राजकीय परिणाम नक्की होणार. विरोधी मतांचे होऊ शकते.

पण ह्यातून जी चर्चा पुढे येते आहेत त्यात काही व्यापक मुद्दे दिसताहेत. उदाहरणार्थ, एक मुद्दा असा मांडला जातोय कि वर्दीतील लोकांनी असे वागले तर मग कायदा आणि सुव्यवस्था राहणार नाही. बरोबर आहे.पण खरच कायदा आणि सुव्यवस्था राहिली आहे का? प्रशासन, कोणासाठी काम करतात? पोर्शे प्रकरणात नक्की काय आढळून आले? इतके मोठे उदाहरण नको. आगदी रोजचे साधे उदाहरण घेऊ. वाई तून मुंबईला रोज खाजगी वाहने बेकायदेशीर वाहतूक करतात. आठ -नऊ माणसे भरून ह्या गाड्या सुसाट सुटतात. सानपाडा पुलाखाली त्यांच्याकडून एक माणूस हप्ते गोळा करतो. तो कोणासाठी करतो? अशिक्षित मुस्लीम तरुण, आदिवासी, भटके, ह्यांना पोलिसांची कोणती हिंसा सहन करावी लागते हे पाहिले तर ह्या व्यवस्था ज्यांना आवाज नाही त्याना कश्या वागवतात हे लक्षात येईल. त्या मुळे केवळ ह्या घटनेमुळे कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात येईल असे नाही. ती आधीच संपली आहे. मध्यम वर्गाचा ह्या व्यवस्थांशी संबंध येत नाही म्हणून त्याना सगळे नीट चालले आहे असे वाटते.

व्यवस्था आता मुठभर लोकांच्या हातात आहे. कायदा, पोलीस, प्रशासन, विद्यापीठे आणि न्यायालये, इतर शासकीय संस्था ह्यांचे आधीच वाटोळे झाले आहे. हे सगळ्या पक्षानी केले असले तरी गेल्या दहा वर्षात ह्या बाबत अगदीच कळस गाठला गेला आहे हे नक्की.

दुसरा मुद्दा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा. एक तर कंगना जे बोलते त्यात अभिव्यक्ती वगैरे काहि नाही. कोणाच्या आईला , आजीला शंभर रुपयात आणली, स्वातंत्र्य भिक मागून मिळाले वगैरे म्हणणे हि काही अभिव्यक्ती नाही. पण कंगना काय बोलते ह्या कडे फार लक्ष देण्याचे कारण नाही. आज खरच गंभीरपणे सरकारला रुचणार नाही असा मुद्दा जोरकस पणे मांडू शकतो का? फेसबुक वगैरेच्या चर्चा सरकारला फार त्रास देत नाहोत म्हणून चालू शकतात. पण विकासाची पर्यायी मोडेलस, जल -जंगल-जमीन वर आदिवासी समूहांचा ताबा, असे प्रस्थापित हितसंबंधाना धक्का देणारी मांडणी केली कि लगेच सरकारी यंत्रणा दमन करते. उन्मादी धार्मिक टोळ्यांना न आवडणारी मांडणी केली कि लगेच पोलीस कामाला लागतात. ह्या धार्मिक टोळ्या मात्र वाटेल ते करू शकतात. व्यवस्था ठरावीक घटकांसाठी चालते. इतराना दाबून टाकते. हे आज झालेले नाही. हे सुरुंग सर्व पक्षांनी लावलेले असतील, पण गेल्या काही वर्षात हे खूपच टोकाला गेले आहे.

मूळ मुद्दे हे आहेत. चर्चा ह्यांची व्हायला पाहिजे. उगाच कंगना सारख्या फडतूस व्यक्तीला महत्व नको.

लोकसंसद

## पावसाळी पर्यटन करताना काळजी घ्या !

पावसाचे मुंबईसह राज्यात नुकतेच आगमन झाले आहे. यंदाचा जीवघेणा उकाडा सहन केल्यानंतर मिळालेल्या पावसाच्या गारव्याने सामान्य माणूस सुखावला आहे. राज्यातील अशी काही पर्यटनस्थळे आहेत ज्या ठिकाणी पावसाळ्यात आनंद लुटण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक येतात. धबधबे, नद्या, तळी किंवा समुद्रकिनारे लाभलेली ही स्थळे पावसाळ्यात ओसंडून वाहू लागतात. ही ठिकाणे जशी पर्यटकांना मनमुराद आनंद देतात तशीच याठिकाणी योग्य ती काळजी न घेतल्यास ती पर्यटकांचा जीव घेण्यासही कारणीभूत ठरू शकतात. अशा पावसाळी पर्यटनस्थळांच्या ठिकाणी दरवर्षी कुठेनाकुठे अपघात होऊन पर्यटक पाण्यात बुडाल्याच्या किंवा वाहून गेल्याच्या बातम्या वाचनात येतात. पाण्याच्या ठिकाणी उत्साहाच्या भरात पर्यटक स्वतःला झोकून देतात. बऱ्याचदा पाण्याच्या खोलीचा आणि वेगाचा अंदाज न आल्यामुळे अपघात घडतात. आपण सहलीसाठी जातो तेव्हा घरी आपली कुणीतरी वाट पाहत असते. आपण केलेली मौजमजा त्यांना ऐकून अनुभवायची असते. अशा आपल्या जिव्हाळ्याच्या व्यक्तीला धक्का बसणारी बातमी मिळणार याची काळजी घेणे आपले कर्तव्यच नव्हे का?

**- जगन घाणेकर,** मुंबई

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**११ जून**

**१९२४:-** 'नाना फडणिसांचे चरित्र', 'हरिवंशाची बखर', 'इचलकरंजी संस्थानचा इतिहास' आदींचे लेखक, इतिहासकार वासुदेवशास्त्री खरे यांचे निधन. त्यांनी दोन नाटके लिहिली व 'यशवंतराय' या खंडकाव्यासह काही पद्यरचनाही केल्या. 'खरेशास्त्री यांच्या एवढा अवाढव्य माणूस एखाद्या राष्ट्रात वारंवार उपजत नसतो' अशा शब्दात इतिहासाचार्य राजवाड्यांनी त्यांचा गौरव केला आहे. **१९२६:-** लेखक, पत्रकार सदानंद तुकाराम चेंदवणकर यांचा जन्म. यांची 'अणूची कथा', 'अवधूत भक्तांची श्रद्धास्थाने' मधून भारतातील दहा दातीर्थ क्षेत्राची माहिती दिली आहे. 'आमचे मित्र आणि शत्रू' मधून प्राण्यांची माहिती दिली आहे. 'अष्टविनायक', 'काकाराज' मधून कावळ्यांची माहिती तसेच 'चंद्रशेखर आझाद', 'जयंत नारळीकर', 'राष्ट्रपती जाकीर हुसेन', 'पं. सातवळेकर', 'माधव राव पेशवा', 'विवेकानंद आदींच्या चरित्रा सह 'पेनिसिलीनची कहाणी', 'ही पहा मुंबई', 'हे विमान फिरते अधांतरी' मिळून चाळीस एक पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९२९:-** 'अनंततनय' नावाने काव्यलेखन करणारे दत्तात्रेय अनंत आपटे यांचे निधन. 'श्री महाराष्ट्र शारदामंदिर' या कवींसाठी स्थापन झालेल्या संस्थेचे ते आधारस्तंभ होते. 'हृदयतरंग (भाग १ ते ३), पद्यदल आणि 'श्रीमत तिलक-विजय' हे लो. टिळकांचे ओवीबध्द चरित्र आदी काव्यपुस्तके त्यांच्या नावावर आहेत. त्यांची बरीचशी कविता स्पूट पण भावगीते संप्रदायातील नाही. 'नवरस-मंजरी', 'अंतर्निद्ध कलिका', 'सर्गाचे दारांत', 'श्री शारदादतिका' ह्या त्यांच्या दीर्घ कविता, 'काव्यवर्षा', 'विनायकांची कविता' हे त्यांचे संपादित तर मुलांसाठी 'बालगीताः पूर्वार्ध व उत्तरार्ध', 'स्त्रियांसाठी-झोपाळ्यावरची गीता', 'संगीत कलिंदा' हे नाटक, प्राकृत कविचरित्र भाग १ व २ ही पुस्तकेही त्यांच्या नावावर आढळतात. **१९३१:-** 'मेनका', 'माहेर' या पाक्षिकांचे तसेच 'जत्रा' या साप्ताहिकाचे संपादक, प्रकाशक, लेखक पुरुषोत्तम विष्णू बेहरे यांचा जन्म. 'एका गाढवाची आत्मकथा' तसेच 'कलावंत', 'बावन्न पो', 'यक्षप्रश्न' या कादंबऱ्या आणि 'शृंगार कथा' चे संपादन अशी साहित्य संपदा. **१९३९:-** ज्येष्ठ चित्रपट समीक्षक लेखक सुधीर नांदगावकर यांचा जन्म. वास्तव रुपवाणी हे नियतकालिक आणि 'मम्मी' आणि 'थर्ड आहे' हे दोन चित्रपट महोत्सव ही त्यांची महत्त्वाची कामे अनेक वर्तमानपत्रात ते लिखाण करत होते. **१९४२:-** मराठीतील महत्त्वाचे आधुनिक, प्रयोगशील कवी, लेखक आणि अभ्यासू समीक्षक विलास सारंग यांचा जन्म. 'सिसिफस आणि बेलाक्या', 'अक्षरांचा श्रम केलाफ आदी समीक्षा-लेखन, 'सर्जनशोध आणि लिहिता लेखक', 'अमर्याद आहे बुध्द' सारखे अभ्यासू चिंतन, 'रुद्र (कादंबरी) तसेच 'मॅनहेलमधला माणूस', 'सोलेदाद' आदी अनेक पुस्तके मराठीत, तर दिल्लीतील तंदूर- कांडावरल्या 'तंदूर सिंडर्स' या इंग्रजी कादंबरीसह अनेक इंग्रजी (ललित व समीक्षापर) पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. प्रकृती साथ देत नसताना, आजही ते लिहिते आहेत. **१९४३:-** कवयित्री लिला दत्तात्रय धनपलवार यांचा जन्म. 'गुलमोहर' हा काव्यसंग्रह त्यांचा प्रकाशित. १९५०:- स्वातंत्र्यसेनानी, कादंबरीकार, कवी गांधीवादी विचारवंत साने गुरुजी यांचे निधन. स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होऊन अनेक वर्षे तुरुंगात राहून जवळ जवळ १२५ हून अधिक पुस्तके विविध विषयांवर त्यांनी लिहिलीत. राजवाडे, रविंद्रनाथ टागोर यांच्या आत्मचरित्राशिवाय 'मानव जातीची कथा', 'दिल्ली डायरी सारखे ग्रंथ', 'गोड गोड गोष्टीचे दहा मार्ग', 'भारतीय संस्कृती', 'सुंदर पत्रे' या पुस्तकांसह त्यांच्या 'श्यामची आई' या पुस्तकाने इतिहास घडवला. तसेच १४ अनुवादीत ग्रंथही त्यांच्या नावावर आहे. साधी, सोपी मराठी भाषा, सहजस्पुर्तता आणि उत्कटता हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्ये आहेत. **१९५२:-** नाट्यलेखक, नाट्यकलावंत बा. ल. मेश्राम यांचा जन्म. ह्यांनी 'जातीच्या नावावर' आणि 'आघात' ही नाटके लिहिली आहेत. **१९५३:-** कवी, लेखक, गीतकार प्रा. रायभान दवंगे यांचा जन्म. यांच्या साहित्यसंपदेत 'आभाळवेणा', 'काळोखकळा', 'तांडा' हे काव्य संग्रह आणि 'प्रहार' ही कादंगरी प्रसिध्द. **१९५६:-** आंतरराष्ट्रीय कीर्तीचे मराठी सांख्यकीशास्त्र डॉ.राजीव लक्ष्मण करंदीकर यांचा जन्म. डॉ. करंदीकरांचे गणित व प्रॉबेबिलिटी थिअरी या विषयांवर अनेक लेख प्रकाशित झाले. या विषयावरील व्याख्यानासाठी युरोप, अमेरिका, जपान आदी देशांना भेटी दिल्या. गणित व सांख्यकीशास्त्रातील विविध प्रश्नावर त्यांचे सतत संशोधन चालू असते. अलीकडे निवडणुका पार पाडल्यानंतर जी जनमत चाचणी घेऊन तिच्या आधारावर निवडणुका निकालांचा निष्कर्ष काढला जातो. त्यात काही नव्या संकल्पना रुढ करण्याचे श्रेय डॉ. करंदीकर यांनाच जाते. उदा. १९९६च्या लोकसभेच्या निवडणुकीत कोणत्या पक्षाला किती जागा मिळतील हा त्यांनी वर्तविलेला अंदाज बऱ्याच अंशी खरा ठरला. या संदर्भात त्यांनी एक सॉफ्टवेयर विकसित केले असून त्याचा प्रयोग मतमोजणीच्या कालावधीत करण्यात आला आणि तो यशस्वी झाला आहे. **१९५९:-** साहित्यिक डॉ. महेश केळुसकर यांचा जन्म. २ कादंबऱ्या, ५ काव्यसंग्रह, १ विनोदी कथासंग्रह, १ ललित लेखसंग्रह, १ बालकथासंग्रह आणि ३ संपादने अशी साहित्य संपदा. **२०००:-** कादंबरीकार, नाटककार सत्यवान नामदेव सूर्यवंशी यांचा जन्म. 'जीवन', 'पत्र्याची चाळ', 'पंकज', 'गोल देऊळ', 'धर्मशाळा', 'लालराज्य' या त्यांच्या कादंबऱ्या ध्येयवादी वृत्तीचे दर्शन घडवतात. 'सुखाचा संसार', 'ठासून झाले पाहिजे', 'फुटपायरी' आदी नाटकांतून मुंबईच्या बकाल वस्त्या, पीडितांचे प्रश्न प्रभावीपणे मांडले. सोपी कथानके, सुबोध शैली हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्ये आहेत. **२००१:-** नाट्यलेखक पुरुषोत्तम पांडुरंग तथा बाळभाटे यांचे निधन. **२०१३:-** अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे एक धडाडीचे कार्यकर्ते डॉ. श्रीधर राजगुरु यांचे निधन.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**११ जून**

१) श्री. गंगाधर तुकाराम राउत
मेटपाडा, अलिबाग, ११-६-१९४४
२) श्रीम.सुषमा अशोक सोमण
अलिबाग, ११-६-१९५१
३) श्रीम.सुरेश दत्तात्रय वालेकर
श्रीबाग-२, ११-६-१९४९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# विद्युत समस्यांवर उपाय योजना करा

**। उरण । प्रतिनिधी ।**

**उरण तालुक्यात मोठ्या प्रमाणात मुसळधार पाऊस पडतो. या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी झाडे वीजेच्या तारांवर पडतात. तसेच, सततच्या पावसामूळे कधी दिवसा तर कधी रात्री वीज खंडीत होते. याचा फटका सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व आजारी व्यक्ती आदि लोकांना मोठया प्रमाणात बसतो. वीज ये-जा करत असल्याने नागरिकांच्या घरातील पंखे, टीव्ही, फ्रिज आदी उपकरणेही खराब होत असल्याने त्याचा आर्थिक भुर्दंड नागरिकांना बसत असतो. या समस्यांवर वेळीच योग्य ती उपाय योजना झाली नाही तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षातर्फे तीव्र आंदोलन करण्याचा इशारा प्रदेश सरचिटणीस भावना घाणेकर यांनी प्रशासनाला दिला आहे.**



### भावना घाणेकर आक्रमक

तालुक्यातील एखादया भागात वीज गेली असता त्याच भागातील वीज न घालवता संपूर्ण तालुक्याची वीज घालवली जाते. तसेच, मुसळधार पाऊस पडल्यानंतर पडलेली झाडे वीजेच्या तारांवर तशीच पडून राहतात. महावितरणचा कर्मचारी वर्ग वेळेत त्या ठिकाणी पोहोचत नाही. यामुळे नागरिकांना वीजेपासून तासनतास वंचित राहावे लागते. या सर्व वीजेच्या संदर्भात नागरिकांनी महावितरणाच्या कार्यालयात फोन केला असता तो फोन देखील बंद असतो. जरी फोनची रिंग वाजली तरी फोन कोणीच उचलत नाही. रात्री अपरात्री पाऊस, वादळवाऱ्यामुळे कुठे काही अनूचित घटना घडली किंवा अपघात घडला तर अशा आपातकालीन वेळी नागरिकांचा फोनद्वारे महावितरणच्या कार्यालयात संपर्क होत नाही. त्यामूळे सर्वसामान्य नागरिकांना कोणत्या कारणामूळे लाईट गेली याची ही माहिती मिळत नाही. अशावेळी नागरिकांनी काय करावे, असा प्रश्न उपस्थित होत आहेत.

या उरणच्या सर्वसामान्य जनतेची पावसाळ्यातील वीजेची महत्वाची समस्या लक्षात घेऊन पावसाळ्यात वीज खंडीत करू नये. ज्या विभागात काम चालू असेल त्याच भागातील वीज घालवावी, कामासाठी इतर ठिकाणाची वीज खंडीत करू नये. तसेच, नागरिकांना आपली समस्या, तक्रार फोनद्वारे कार्यालयात कळविण्यासाठी त्वरित लँडलाईन (हेल्पलाईन) सुरू करून जनतेच्या समस्या त्वरित सोडवाव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या महिला प्रदेश सरचिटणीस भावना घाणेकर यांनी प्रधान सचिव (मुंबई मंत्रालय), उर्जामंत्री (मुंबई मंत्रालय), जिल्हाधिकारी अलिबाग रायगड, उपायुक्त परिमंडळ झोन २, तहसिलदार उरण, वरिष्ठ पोलिस निरीक्षक उरण, मुख्य अभियंता महावितरण उरण, महाराष्ट्र विद्युत मंडळ उरण आदी ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन केली आहे.

> **ग्राहकांची समस्या लक्षात घेऊन ती तात्काळ सोडविण्याचा प्रयत्न करू. या समस्येबाबत संबंधित अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. नागरिकांच्या समस्यांची योग्य ती दखल घेतली जाईल.**
> **– सिंहाजीराव गायकवाड, अधीक्षक अभियंता, वाशी**

# महावितरणचा भोंगळ कारभार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ गावात १४ मे रोजी आलेल्या वादळात मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या एका कार्यालयावर तसेच एका घराच्या छप्परवर झाड पडल्याने दोघांचेही नुकसान झाले होते. या घटनेनंतर महावितरण विभागाला कळविण्यात आल्यानंतर तात्काळ कोणीही महावितरणचे कर्मचारी त्या ठिकाणी पोहचला नाही. यावेळी स्थानिक रहिवाशी पप्पू जाधव आणि कार्यकर्त्यांनी स्वखर्चाने झाडे तोडण्यास सुरुवात केली. त्यासाठी नेरळ गावातील वीज तब्बल दिवसभर बंद ठेवावी लागली. मात्र, तांत्रीक कारणामुळे कोसळलेली झाडे पुर्णपणे तोडण्यात आली नाही. शेवटी वीज पुरवठा सुरू करताना महावितरण कर्मचाऱ्यांनी अंधाराचे कारण देत उद्या येऊन अर्धवट राहिलेली झाडे तोडून टाकू, असे आश्वासन दिले होते. परंतु, आठ दिवस लोटले तरी पुन्हा ते त्या ठिकाणी फिरकलेच नाहीत.



दरम्यान, महावितरण विभागाकडून मागील २५ दिवसांत दोनवेळा झाडे कापण्यासाठी भारनियमन करण्यात आले होते. मात्र, नेरळ गावातील पडलेले झाड तोडायला कोणताही कर्मचारी अद्यापही पोहचला नाही. यामधून महावितरणचा भोंगळ कारभार दिसण्यात येत आहे.

# ताडपत्रीला वाढती मागणी

**। उरण । वार्ताहर ।**

पावसाळा सुरु होण्याची चाहूल लागली अन् ताडपत्री घेण्याकडे नागरिकांची लगबग सुरु झाल्याचे चित्र उरण बाजार पेठेत दिसू लागले आहे.

पावसाळा सुरु होण्याची चाहूल लागल्याने आपल्या घरामध्ये पावसाचे पाणी जाऊ नये तसेच आपली सर्व सामुग्री भिजून नुकसान होऊ नये यासाठी घरावर ताडपत्री टाकून संरक्षण केले जाते. दर वर्षीप्रमाणे यंदाही उरण बाजार पेठेतील दुकानांत विविध कंपनीच्या ताडपत्री विकायला आल्या आहेत. निळ्या, लाल, पिवळ्या व वेगवेगळ्या आकारात उपलब्ध आहेत. यावेळी ताडपत्री विक्रेत्यानी सांगीतले की, पावसाळा सुरु झाला कि आम्ही वेगवेगळ्या कंपनीच्या ताडपत्री आणत असतो. सध्या ५० ते ७० रुपये मीटर व ३ रुपये २० पैसे चौरस



फूट या भावाने असलेले रेडीमेड ताडपत्री आम्ही विकतो.

# इंदुबाई गावंड यांचे निधन

**।उरण।वार्ताहर।**



शेकापचे पूर्व विभाग चिटणीस संदीप गावंड यांच्या मातोश्री इंदुबाई रामदास गावंड यांचे २ जून रोजी वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झाले. त्यांनी शैक्षणिक गंगोत्रीच्या माध्यमातून अनेक गरीब व गरजू लोकांना मदत करून त्यांचे शिक्षण पूर्ण केले. त्यांच्या पश्चात नऊ मुले, नऊ सूना, नातवंडे, पतवड, नातसुना असा मोठा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवारी (दि.११) नाशिक येथे तर दिवस कार्य शुक्रवारी (दि.१४) आवरे येथे होणार आहे.

# बाळू गायकवाड यांचा वाढदिवस साजरा

**। सोगाव । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील चोंढी येथील ज्येष्ठ समाजसेवक सुधीर उर्फ बाळू गायकवाड यांचा गुरुवारी (दि.६) ७६ वा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

बाळू गायकवाड यांचा वाढदिवस त्यांच्या मुलांनी जुन्या मित्रपरिवारांच्या व कुटुंबातील सदस्यांच्या उपस्थितीत साजरा केला. यावेळी भक्तिमय मैफिलीच्या वातावरणात त्यांच्या मित्रांनी व कुटुंबातील इतर सदस्यांनी भावुक होत आपल्या बाबांना शतायुषी होण्यासाठी भरभरून शुभेच्छा दिल्या. यावेळी शुभेच्छा देण्यासाठी रायगड जिल्हा काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ उपाध्यक्ष राजाभाऊ ठाकूर, उमेश



ठाकूर, अशोक म्हात्रे, धनाजी जोशी, दत्तात्रेय पाटील, शरद आमले, विकास जाधव, प्रमोद जाधव, विद्याधर दांडेकर, भंडारी, गंगाधर नाखवा, अरुण कोळी, ज्ञानेश्वर नाखवा, बाबू, मंगेश आमले, राजू शिंदे, नंदू कर्वे, उमाकांत नार्वेकर, मेघनाथ पाटील, संदेश पाटील, डॉ.किरण शेट्ये, आसिफ मलिक, निलेश उतेकर, ओंकार आमले, नदीम आत्तार, प्रदीप पाटील, विजय मोरे, सुदेश सावंत, विजय आमले व इतर पिंट्या गायकवाड मित्रमंडळाचे कार्यकर्ते व बाळू गायकवाड यांच्या कुटुंबातील इतर सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किल्ले मदगडाची स्वच्छता मोहीम

**। बोर्ली पंचतन । वार्ताहर ।**

'गिरीदुर्ग संवर्धनाय च: समर्पित' हे ब्रीद घेऊन गेली २४ वर्ष गडदुर्ग संवर्धनाच्या मोहिमेत प्रामाणिक योगदान देणाऱ्या गिरीमित्र प्रतिष्ठान डोंबिवलीच्यावतीने दि.८ आणि ९ जून रोजी आयोजित केलेली किल्ले मदगड संवर्धन मोहीम यशस्वीरित्या संपन्न झाली. या मोहिमेत प्राप्ती पाटील (१०) या छोट्या मुलीसह बबन कुडतरकर (५३) आणि इतर वीस सदस्य सहभागी झाले होते. आजच्या परिस्थितीत या गडावर मोठ्या प्रमाणात अस्ताव्यस्त झाडी वाढलेली असून एकही परंपरागत पायवाट अस्तित्वात नाही. तर, काही पुरातन अवशेष विखुरलेल्या स्थितीत आहेत. या गडावर एकदोन विहिरी आणि दोन पाण्याच्या टाक्यांपैकी आताच्या परिस्थितीत एका ढासळलेल्या टाक्यामध्ये असलेला पाणीसाठा लगतच्या झाडांचा पाला पाचोळा आणि मातीपडून खराब झाल्याचा प्रथमदर्शनी निदर्शनास आले. तर, गडाच्या पाठीमागच्या भक्कम तटबंदीमधे बेसुमार वाढलेल्या वृक्षांमुळे भविष्यात तटबंदी ढासळण्याची शक्यता आहे. यावेळी मंगेश कोयंडे यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झालेल्या या दोन दिवसीय मोहिमेत श्रीवर्धन तालुक्यातील वांजळे गावाजवळच्या मदगड किल्ल्यातले पुरातन अवशेष काळाच्या ओघात मातीच्या ढिगाऱ्याखालील तसेच झाडाझुडपांनी वेढले होत ते मोकळे करण्यात आले. तसेच, मदनगडावर दुर्गप्रेमींची पावले नक्कीच वळतील आणि यातून स्थानिकांना रोजगार मिळण्याबरोबरच शासनाला सुद्धा महसूल मिळेल, असा आशावाद गिरीमित्र प्रतिष्ठानच्यावतीने व्यक्त करण्यात आला.

# मुरुड-रोहा मार्गावरील गारंबी मोरीचे काम रखडले

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

पावसाळ्यापूर्वी मुरुड-रोहा मार्गावरील गारंबी रस्त्यावरील मोरीचे काम पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतु, हे काम पूर्ण न झाल्याने ज्यावेळी पाऊस मोठ्या प्रमाणात पडेल त्यावेळी पाण्याच्या तीव्र प्रवाहामुळे येथील वाहतूक बंद होण्याची शक्यता आहे. मुरुड-रोहा या मुख्य रस्त्यावरील मोरीवर छोटा पूल उभारण्याचे काम फेब्रुवारी महिन्यात सुरु करण्यात आले होते. या मोरीवरील पूल पूर्ण झाला असून बाजूच्या भागातील काँक्रिटचे काम अपूर्ण राहिले आहे. तरी हे काम लवकरात लवकर पूर्ण करून हा रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करण्यात यावा, अशी जनतेकडून मागणी होत आहे.

मुरुड-केळघर मार्गे रोहा हा रस्ता वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा व कमी अंतराचा असल्याने या रस्त्यावरून रोज शेकडो वाहने ये-जा करीत असतात. परंतु, गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्याकडे दुर्लक्ष केल्याने ठीक ठिकाणी खड्डे पडले आहेत. हा रस्ता जागोजागी खड्डेमय झाल्याने लोकांना



व वाहन चालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. हा रस्ता नागशेत, गारंबी, पारंगान, धनगरवाडी, गोपाळवटपर्यंत खराब झाला आहे. मागील पावसात मुरुड-केळघर मार्गे रोहा हा रस्ता खचला होता. त्यावेळी एसटी वाहतूक बंद करण्यात आली होती. तेव्हापासून या रस्त्याच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

सध्या या रस्त्यावरील शीघ्रे मोरी व गारंबी मोरी यांची कामे पूर्ण न झाल्याने वाहतूक कच्च्या रस्त्यावरून सुरु आहे. परंतु, ज्यावेळी मोठा पाऊस येईल त्यावेळी पाण्याचा मोठा प्रवाह तयार होऊन कच्च्या रस्त्यावरील वाहतूक सुद्धा बंद होऊ शकते. यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याने लवकरात लवकर या मोऱ्यांची कामे पूर्ण करून रस्ता लवकरात लवकर खुला करावा, अशी जनतेमधून मागणी होत आहे.

# स्कुटीला अपघात; तीघी जखमी

**। रसायनी । वार्ताहर ।**

मोहोपाडा येथून पल्लवी संदीप जंगम (३२) या आपटा फाटा येथे जात असताना लाडीवली गावाजवळ पाठीमागून येणाऱ्या वाहनाने ओव्हरटेक करीत असताना त्यांच्या स्कूटीच्या हँडलला धक्का दिला. यात स्कूटीचा तोल जाऊन पल्लवी जंगमसह त्यांच्यासोबत असणाऱ्या सपना महाडिक व दिया महाडिक या तिघी जखमी झाल्या आहेत. पल्लवी यांना मोहोपाडा येथील पल्स हॉस्पिटलमध्ये तर सपना यांना पनवेल येथील गांधी हॉस्पिटल येथे उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM e-Tender Notice No. 01/2024-25

Online bids (SRM e-Tenders) are invited for following works from the registered contractors. :

| SRM e-Tender No. | RFx no. | Name of work | Estimated cost in Rs. |
|---|---|---|---|
| 01/2024-25 | 7000031264 | Providing services of 6 nos of skilled labour at EHV CCCM DN Panvel, EHV CCCM Sub-Dn Panvel, Kharghar, Kalyan at EHV CCCM Dn Panvel for FY 2024-25.(01.07.2024 to 31.03.2025) | 1457341.00 |
| 02/2024-25 | 7000031311 | Hiring of light motor vehicle (L.M.V) having tourist permit for the office of the Executive Engineer(Civil), EHV CCCM Dn Panvel(Annual Contract) for the year 2024-25. .(01.07.2024 to 31.03.2025) | 443794.00 |
| 03/2024-25 | 7000031031 | Hiring of light motor vehicle (L.M.V) having tourist permit for the office of the Addl. Executive Engineer(Civil), EHV CCCM SDn Panvel (Annual Contract) for the year 2024-25. .(01.07.2024 to 31.03.2025) | 442544.00 |
| 04/2024-25 | 7000031033 | Hiring of light motor vehicle (L.M.V) having tourist permit for the office of the Addl. Executive Engineer(Civil), EHV CCCM SDn Kharghar (Annual Contract) for the year 2024-25. .(01.07.2024 to 31.03.2025) | 445415.00 |
| 05/2024-25 | 7000031034 | Hiring of light motor vehicle (L.M.V) having tourist permit for the office of the Addl. Executive Engineer(Civil), EHV CCCM SDn Kalyan (Annual Contract) for the year 2024-25. (01.07.2024 to 31.03.2025) | 444347.00 |
| 06/2024-25 | 7000031353 | Annual civil maintenance works at 220KV ONGC, 100KV Jite,100KV Patalganga,100KV Bhokarpada, Takka premises, Kalamboli Colony, Bhingari premises and 220KV Wadkhal for F.Y.2024- 25. | 2230961.00 |
| 07/2024-25 | 7000031116 | Annual civil maintenance works for Nerul/Uran/Taloja-I & Taloja-II substations along with colony with other civil works for F.Y 2024-25. | 2008525.00 |
| 08/2024-25 | 7000031117 | Annual civil maintenance works for 400KV Kharghar substation along with other civil works for the F.Y 2024-25. | 2043589.00 |
| 09/2024-25 | 7000031115 | Annual civil maintenance works for Roha/Mahad/100KV Thal substation Mhasala colony along with colony other civil works for F.Y 2024-25. | 2073410.00 |
| 10/2024-25 | 7000031114 | Annual civil maintenance works for Wasamabe Colony/220KV Apta/200KV Tambati/100KV Khopoli S/stn along with colony with other civil works for F.Y 2024-25. | 1999441.00 |
| 11/2024-25 | 7000031276 | Annual civil maintenance contract for 400KV Nagothane Substation civil works for year FY 2024-25. | 1604702.00 |
| 12/2024-25 | 7000031308 | Annual civil maintenance contract for Mohane, Murbad,Shahapur, Technocraft Murbad, Centuryreon Ulhasnagar Jindal Vashind substation, colony,offices under Kalyan S/Dn for year 2024-25. | 2038754.00 |
| 13/2024-25 | 7000031275 | Annual civil maintenance contract for 220KV Kandalgaon substation with colony and 220KV Vilebhagad substations for civil works for year FY 2024-25. | 1710948.00 |
| 14/2024-25 | 7000031274 | Annual civil maintenance contract for Dombivali, Dombivali Pal, Morivali, Anandnagar, Jambhul, Neral, Palava substation, colony, offices under Kalyan S/Dn for year 2024-25. | 2038754.00 |

For detailed information, please see SRM e-Tender section of our website: www.mahatransco.in.
Contact person: Executive Engineer (Civil), Panvel. Telephone No. (022)27480325

SD/-
Executive Engineer (Civil), Panvel.

# शॉक लागून बेडूकांचा मृत्यु

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान या पर्यटन स्थळी रस्त्याच्या दुतर्फा पथदिवे बसविण्यात आले आहेत. या पथदिव्यांमधील वीज प्रवाह जमिनीत उतरून विजेचा धक्का लागून असंख्य बेडूक मृत्युमुखी पडले आहेत. रविवारी (दि.९) रात्री आलेल्या पावसात ही घटना घडली असून अमन लॉज स्थानक परिसरात असलेल्या पथदिव्यांच्या आजूबाजूला बेडूक मरून पडल्याचे आढळून आले आहेत. माथेरानमध्ये दस्तूरी ते अमन लॉज या परिसरात रस्त्याच्याबाजूलापथदिवेबसविण्यात आले आहेत. हे पथदिवे संध्याकाळी सहाच्या सुमारास सुरू केले जातात. गेली काही दिवस रात्रीच्या वेळी येणाऱ्या पावसामुळे झालेल्या शॉर्ट सर्किटमध्ये तेथे असलेल्या लहान बेडकांचा मृत्यू झाला. तसेच, रस्त्याच्या जवळ रेलिंगसुध्दा आहे. या ठिकाणी रात्री अनेक पर्यटक येथून प्रवास करत असतात. त्यामुळे ही गंभीर समस्या लवकरात लवकर सोडवावी, अन्यथा एखद्याचा मृत्यू होऊ शकतो. यासाठी माथेरान नगरपरिषद जबाबदार राहील, असे स्थानिकांचे म्हणणे आहे.

# पनवेलमध्ये मोफत वह्यांचे वाटप

**। पनवेल । वार्ताहर ।**

महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा पनवेल तालुक्याच्यावतीने पनवेलमध्ये समाजातील विद्यार्थांचा गुणगौरव समारंभ व मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. पनवेल शहरातील टपाल नाका येथील शनी मंदिरात झालेल्या या समारंभासाठी महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा रायगड जिल्ह्याचे अध्यक्ष गणेश महाडीक, संज्योत चाळेकर, सुनील खळदे तसेच समाज बांधव व गुणवंत विद्यार्थी उपस्थित होते.



समाजातील दहावी व बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार त्याचप्रमाणे पहिली ते बारावीतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी गणेश महाडीक म्हणाले की, समाजातील विद्यार्थ्यांसाठी राबवित असलेल्या शैक्षणिक उपक्रमांबद्दल तालुका अध्यक्ष सुनील खळदे यांचे कौतुक करून समाजातील विद्यार्थ्यांनी या शैक्षणिक सुविधांचा आपल्या गुणवत्तेसाठी उपयोग करावा, असे सांगितले.

# मुंबई-गोवा महामार्ग चिखलमय

## अपघाताची दाट शक्यता

**। कोलाड । वार्ताहर ।**

**रोहा तालुक्यात शनिवारी (दि.९) दुपारी तसेच मध्यरात्री पावसाने दमदार हजेरी लावली होती. त्यामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले होते. यामुळे मुंबई-गोवा महामार्गावरील कोलाड आंबेवाडी नाक्यावरील रस्त्यावर पाणी साचले होते. पहिल्याच पावसात रस्त्यावर पाणी तुंबल्याने अनेकांची तारांबळ उडाली. तर, पादचाऱ्यांना त्या चिखलमय पाण्यातूनच मार्ग काढावा लागत होता.**



### प्रशासन निद्रावस्थेत

तालुक्यात पावसाची दमदार सुरूवात झाली असून मुंबई-गोवा महामार्गावर कोलाड आंबेवाडी नाक्यावरील रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम तसेच उड्डाण पुलाचे काम सुरू असल्याने काही ठिकाणी खोदाई करण्यात आलेली आहे. त्यातच जागोजागी पडलेल्या खड्ड्यांत पाणी तुंबल्याने वाहतुकीस अडथळा ठरत असून चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तसेच, रस्ता चिखलमय झाल्यामुळे रिक्षा, दुचाकी तसेच पादचारी नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत.

मुंबई-गोवा महामार्ग तसेच कोलाड आंबेवाडी नाका चौक हे बाजारपेठेचे मध्यस्थी ठिकाण असुन येथून मुंबई-गोवा तसेच पुणे, रोहा, मुरुड, अलिबागकडे जाण्यासाठी प्रचंड मोठया प्रमाणात वाहतूक सुरु असते. परंतु, हा रस्ता पूर्णपणे खचला आहे. तर, काही ठिकाणी रस्त्याचे डांबर निघाले असून रस्त्याचे खडे वर आल्यामुळे या रस्त्यावरुन दुचाकी गाड्या स्लिप होत आहेत. यामुळे मोठा अपघात घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याला निद्रअवस्थेत असलेला प्रशासन व प्रशासनाचा ठेकेदारावर नसलेला वचक हे कारणीभुत आहेत. यामुळे शासनाच्या तिजोरीतील करोडो रुपये वाया गेले तरी रस्त्याचे काम पुर्ण होत नाही. परंतु, खचलेल्या व निकृष्ट झालेल्या रस्त्यामुळे कोणाचा नाहक बळी गेला तर याला जबाबदार कोण, अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवाशी वर्गातुन व्यक्त केली जात आहे.

निवडक

## फेरीवाले राष्ट्रवादीच्या रडारवर

**पनवेल :** येथील प्रभाग समिती 'अ' कार्यक्षेत्रात असणाऱ्या अनधिकृत फेरीवाल्यांवर महापालिकेने कारवाई करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष शहबाज फारुक पटेल यांनी पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, हे फेरीवाले अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकामे करीत आहेत. त्यामुळे शहराच्या प्रतिमेला गालबोट लागत असून अनधिकृत फेरीवाल्यांचे मोठे साम्राज्य निर्माण झाले आहे.

## भूखंडाचा ताबा बार कौन्सिलला

**पनवेल :** महाराष्ट्र शासनाकडून ॲडव्होकेट्स अकॅडमीकरीता तळोजा एमआयडीसी, पनवेल येथे आठ हजार चौरस मीटर क्षेत्राचा भूखंड देण्यात आला आहे. त्या भूखंडाचा ताबा बार कौन्सिल महाराष्ट्र आणि गोव्याचे अध्यक्ष ॲड. राजेंद्र उमाप यांनी स्वीकारला. यावेळी बार कौन्सिल ऑफ इंडियाचे सदस्य ॲड. आशिष देशमुख, ॲड. संग्राम देसाई, सेक्रेटरी प्रवीण रणपिसे आणि पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, ॲड. भूषण म्हात्रे आदी उपस्थित होते.

## पलांशा अग्रवाल प्रथम

**पनवेल :** नवी मुंबई शाखेतील आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडची विद्यार्थिनी पलांशा अग्रवाल हिने नीट २०२४ परीक्षेत (AIR) उत्कृष्ट ऑल इंडिया रँक १ मिळवला आहे. पलांशा हिने या प्रतिष्ठित वैद्यकीय प्रवेश परीक्षेत ७२० पैकी ७२० गुण मिळवले आहेत. जे तिच्या कठोर परिश्रम आणि समर्पणाचा पुरावा आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने हा निकाल जाहीर केला. पलांशाने जागतिक स्तरावर कठीण प्रवेश परीक्षांपैकी नीट परिक्षेची तयारी केली होती.

## ट्रकची दुचाकीला धडक

**नागोठणे :** नागोठणे- चिकणी गावाजवळ दुचाकी व ट्रकमध्ये झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. पारस सांडे याचा जागीच मृत्यू झाला आहे. तर गणेश पाटील गंभीर जखमी झाला आहे. या अपघातासंदर्भात अधिक तपास सुरु असून कुणाच्या चुकीमुळे सदरचा अपघात घडला यासंदर्भात माहिती घेऊन योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे सपोनि हरेश काळसेकर यांनी स्पष्ट केले.

## आदिवासींचा पाणीप्रश्न मार्गी

**पनवेल :** फणसवाडी येथील बोअरवेल चालणाऱ्या विजेचे कनेक्शन बंद झाल्यामुळे बोअरवेल बंद पडली होती. शिवसेना ठाकरे गटाने पाठपुरावा केल्यामुळे ती पुन्हा सुरू झाली असून, पाणीप्रश्न मार्गी लागला आहे. गुरुनाथ पाटील यांनी आदिवासीवाडी येथे धाव घेत अभियंता यांच्याशी संपर्क साधून त्यांना त्या ठिकाणी बोलावून घेतले व उभे राहून बोअरवेलची वीज दुरुस्त करून घेतली. त्यामुळे आदिवासी बांधवांचा पाणीपुरवठा तात्काळ सुरू झाला.

# शिवराज्याभिषेकानंतर गडाची स्वच्छता

## मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा स्तुत्य उपक्रम

**। नागोठणे । वार्ताहर ।**

**किल्ले रायगडावर ३५१ वा राज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यासाठी राज्यासह देशातून शिवभक्तांनी स्वराज्याच्या राजधानीवर नतमस्तक होण्यासाठी गर्दी केली होती. आलेली गर्दी सायंकाळनंतर ओसरली असली तरी किल्ल्यावरील स्वच्छतेचा प्रश्न मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाला सतावत होता. यामुळे मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याच्या दुसऱ्या दिवशी नियोजनबद्ध पद्धतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. गोळा केलेल्या कचऱ्याची विल्हेवाट देखील तातडीने लावण्यात आली.**



७ जून रोजी मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मुंबई विद्यापीठ कुलगुरू प्रा. डॉ. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, प्र. कुलसचिव प्राचार्य डॉ. बळीराम गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली व विद्यार्थी कल्याण विभाग संचालक डॉ. सुनील पाटील व राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यकारी अधिकारी प्रा. सुशील शिंदे यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

जिल्हा परिषद, रायगडतर्फे तसेच अनेक सेवाभावी संस्था, तरूण मित्र मंडळे यांच्या तर्फे स्वच्छता मोहीम राबवली जाते. पण तरीही मनुष्यबळ कमी पडत असल्याने या कामाला म्हणावी तेवढी गती प्राप्त होत नाही. त्यात पावसाचे दिवस असल्याने कचरा जाग्यावर कुजला तर या कचऱ्यातून दुर्गंधी येण्याची भीती असते.

त्यामुळे यावर्षी मुंबई विद्यापीठाच्या सहकार्याने व रायगड जिल्ह्यातील महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे उन्हाळी सुट्ट्यांमध्ये हा उपक्रम उत्तमरित्या राबविण्यात आला.

एक-एक करीत ४५० विद्यार्थी रोपवेने सकाळी गडावर पोहचले होते. विद्यार्थी स्वंयसेवक पुढे गडावरील होळीच्या माळाच्या ठिकाणी एकत्र होत होते. तेथील माहितीगाराच्या मदतीने स्वंयसेवकांचे पन्नास-पन्नास विद्यार्थ्यांचे ग्रुप बनविले गेले.

रायगड जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागातर्फे इतर सुविधा उपलब्ध करून देण्यात येत होत्या. या नियोजन प्रक्रियेत ते मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी आमचे वरीष्ठ मंडळी सोबत कायम राबत होते. ग्रुपमध्ये स्वच्छतेच्या कामाची विभागणी करण्यात आली. क्षणार्धात सर्व विद्यार्थी स्वंयसेवक आपापल्या नेमून दिलेल्या ठिकाणी स्वच्छतेसाठी निघून गेले.

सलग दोन तास त्यांनी ही सेवा त्या ठिकाणी दिली. गोळा केलेल्या कचऱ्याच्या पिशव्या होळीच्या माळावर जमा करण्यात आल्या. कार्यक्रम अधिकारी आपापल्या महाविद्यालय स्वयंसेवकांसोबत त्यांच्या मदतीला होते. या दोन तासात स्वंयसेवकातर्फे कितीतरी टन कचरा गोळा करण्यात आला.

### मेघराजाच्या साथीने स्वच्छतेचे काम सोपे

**७ जूनला सकाळी ७.३० वाजता बहुतेक महाविद्यालय रायगड किल्ला रोपवे ठिकाणी पोहचले होते. कोणाचीही गैरसोय होऊ नये म्हणून डॉ. सुनील पाटील व प्रा. सुशील शिंदे हे महाड येथे रात्रीच वस्तीला आले होते. यामुळे ते सकाळी लवकर सर्वांच्या अगोदर तेथे पोहचले होते. रोप वे चे बुकिंग अगोदर झालेले होते. नाष्टा, दुपारचे जेवन, पाणी, कचरा ठेवायच्या पिशव्या, सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरणासाठी लागणारे साहित्य हे सर्व त्यांनी मुंबईहून सोबत आणले होते. सकाळी आठ-साडे आठ पर्यंत सर्व महाविद्यालयाचे विद्यार्थी रोपवे ठिकाणी जमले होते. वेगवेगळ्या रंगाचे पोषाख, युनिफॉर्म परिधान करून हे विद्यार्थी स्वत:हून या स्वच्छता अभियानासाठी आलेले होते. पावसाच्या एका मोठ्या सरीने या स्वयंसेवकांचे स्वागत केले. या सरीने मात्र सर्वांची चिंता वाढवली. कारण आकाशात काळेभोर ढग बरसण्याच्या तयारीत होते. पण मेघराजाने चांगली साथ दिल्यामुळे स्वच्छतेचे काम सोपे झाले.**



# पावसाळ्यात रस्त्याची होणार धूळधाण

**। उरण । वार्ताहर ।**

पावसाळा सुरू होण्यास काही दिवसांचा कालावधी उरला असताना सार्वजनिक बांधकाम विभागाने खोपटा-कोप्रोली व दिघोडे-चिर्ले रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम हाती न घेतल्याने यावर्षीच्या पावसाळ्यात सदर रस्त्याची धूळधाण होणार आहे, अशी भीती व्यक्त होत आहे.

उरण तालुक्यातील ग्रामीण भागातील खेड्यांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग म्हणून खोपटा-कोप्रोली आणि दिघोडे-चिर्ले या रस्त्यांकडे पाहिले जाते. या रस्त्यावरुन तालुक्याच्या ठिकाणी किंवा मुंबई शहराच्या दिशेने जाणारे हजारो चाकरमानी, नोकरदार, विद्यार्थी, प्रवासी नागरिक तसेच लहान-मोठी वाहने वापर करत आहेत. त्यामुळे खोपटा-कोप्रोली रस्त्याच्या डांबरीकरणासाठी एनएचएमआय कार्यालयाकडून सुमारे ३ कोटी ७५ लाखांचा निधी खर्च करण्यात आला आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि खासगी कंटेनर यार्ड, गोदाम व्यवस्थापकांकडून जवळजवळ दोन ते तीन कोटींचा निधी खर्च करण्यात आला आहे.

संबंधित कार्यालयातील भ्रष्ट कारभारामुळे खर्च करण्यात आलेला निधी वाया गेला आहे. असे चित्र रस्त्यावरुन मार्गक्रमण करत असताना निदर्शनास येत आहे. पावसाळा सुरू होण्यास काही दिवसांचा कालावधी उरला असताना सार्वजनिक बांधकाम विभागाने खोपटा-कोप्रोली व दिघोडे-चिर्ले रस्त्याच्या डांबरीकरणाचे किंवा रस्ता दुरुस्तीचे काम हाती न घेतल्याने यावर्षीच्या पावसाळ्यात सदर रस्त्याची धूळधाण होणार आहे, अशी भीती प्रवासी नागरिक व्यक्त करत आहेत.

# वीज वितरणकडून समाधानकारक कामे

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनीत विजेच्या समस्या निर्माण होण्याचे प्रमाण वाढल्यामुळे मोहोपाडा, रसायनी, आपटा परिसरामधील नागरिकांमध्ये तीव संताप दिसून येत होता.

महावितरणाने गांभीयाने दखल घेत पनवेल ग्रामीण उपविभाग अंतर्गत मोहोपाडा, रसायनी परिसरात तांत्रिक सुधारणांची कामे हाती घेतलेली असून ती समाधानकारकपणे पूर्ण होत आहेत.



यामध्ये २२० केव्हीचे जाळे विस्तारीत करणे, १८ किमी नवीन उच्चदाब वाहिनी टाकणे उणे १० किमी. जुने कंडक्टर बदलणे, रोहित्र व शहरातील लघुदाब वाहिनीचे जुने पोल काढून त्याजागी नवीन पोल लावणे. आठ किमी लघुदाब वाहिनी जुने कंडक्टर बदलणे. वितरण प्रणालीमध्ये अडथळा आणत असलेल्या झाडांच्या फांद्यांची छाटणी करणे आदी कामाचा समावेश असून कार्यकारी अभियंता लटपटे यांच्या मार्गदर्शनाखाली उपकार्यकारी अभियंता राख , सहाय्यक अभियंता गलांडे , कांबळे यांनी विजेला अडसर ठरणाऱ्या समस्या मार्गी लावण्यासाठी परिश्रम घेतले.

मोहोपाडा विजवितरण कार्यालयांतर्गत सहाय्यक अभियंता गलांडे यांच्याकडून परिसरात वीज समस्येवर तोडगा काढला जात असल्याने त्यांचे कौतुक होत आहे.

# नेरळमध्ये आयुर्विमा महामंडळ संघटनेच्या वतीने वृक्षारोपण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

आयुर्विमा महामंडळामध्ये कार्यरत असलेल्या अखिल भारतीय अनुसूचित जाती जमाती बौध्द आयुर्विमा कर्मचारी संस्थेच्या वतीने नेरळ गावात वृक्षारोपण करण्यात आले. गावातील सुनंदा संकुल येथे हे वृक्षारोपण करण्यात आले.

अखिल भारतीय अनुसूचित जाती जमाती आणि बौध्द आयुर्विमा कर्मचारी कल्याणकारी संघटनेचे सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त वृक्षारोपण करण्यात आले. शहरातील सुनंदा संकुलामध्ये आयुर्विमा कर्मचारी संघटना



यांच्याकडून हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. यावेळी सुनंदा संकुल मधील वृक्षारोपण कार्यक्रम संघटनेचे पश्चिम क्षेत्रीय प्रसारण आणि नियोजन समितीचे सचिव राज बालादकर तसेच सुनंदा संकुलचे अध्यक्ष हंसराज साळवी यांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या वृक्षारोपण कार्यक्रमात सामाजिक क्षेत्रामधील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांनी देखील झाडे लावून सामाजिक उपक्रमात सहभाग घेतला.

त्यावेळी दिनकर बच्छाव, मानेक आहेर, कार्याध्यक्ष राजपाल सोनवणे, कोषाध्यक्ष किरण बागुल, सह कोषाध्यक्ष नंदू गवई. सक्रिय सभासद रामचंद्र पिरकड तसेच सामाजिक कार्यकर्ते आयुब आढाळ, हमीद शहा, राजेंद्र गायकवाड, अनंत कदम, राजू खोले, विजय परदेशी, रुपलता पगारे, ज्योती गायकवाड, अनिल सदावर्ते आदी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे नियोजन तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघटनेचे सचिव रायगड भूषण राजेश गायकवाड यांनी केले.




# ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे ३१ वे पुष्प संपन्न झाले. पनवेल येथील गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रामधे संपन्न झालेल्या झालेल्या या कार्यक्रमात बनारस येथील कुणाल वर्मा यांनी आपली गायन सेवा सादर केली.

प्रसिद्ध गायक ओंकार दादरकर यांचे शिष्य असलेल्या कुणाल वर्मा यानी आपल्या संगीत सभेची सुरुवात पुरीया रागातील विलंबित एक तालातील बंदिशीने केली. त्यानंतर राग शंकरा मधील छोटा ख्याल सादर केला.

शास्त्रीय संगीत गायल्यानंतर त्यांनी ' राम रंगी रंगले, विष्णुमय जग, अबीर गुलाल' ही भक्तिगीते सादर केली. त्यानंतर 'जय गंगे भागीरथी' हे नाट्यगीत सादर केले. 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' या भैरवीने त्यानी संगीत सभेची सांगता केली.

कुणाल वर्मा याना अथर्व देव यांनी संवादिनी, गौरव बॅनर्जी यांनी तबला साथ तर गणेश घाणेकर यांनी तालवाद्यसाथ केली. समीर सोमण यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# नेत्रचिकित्सा शिबिरात ७६ नागरिकांची तपासणी

**। नागोठणे । वार्ताहर ।**

लायन्स क्लब नागोठणे तर्फे आणि आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पीटल पनवेल यांचे सहकार्याने तसेच नागोठणे शहरातील प्रसिद्ध व्यापारी, दानशुर व्यक्तीमत्व व पॉप्युलर ट्रेडिंग कंपनीचे मालक नजमुद्दीन व्होरा यांचे सौजन्याने

नागोठण्यातील शांतीनगर भागातील स्व. बाळासाहेब ठाकरे बालोद्यानमध्ये मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबीर घेण्यात आले. या शिबिरात एकूण ७६ नागरिकांची नेत्रचिकित्सा करण्यात आली. यांतील २२ रुग्ण मोतीबिंदूचे आढळल्याने त्यांना शस्त्रक्रिया करण्यासाठी पनवेल येथील रूग्णालयात पाठविण्यात आले.

या शिबीराचे उद्घाटन नजमुद्दीन व्होरा यांच्या हस्ते शिवप्रतिमेला पुष्पहार घालून करण्यात आले. यावेळी बोलताना नजमुददीन व्होरा यांनी यापुढेही अशा अनमोल कार्यासाठी माझी



कोणतीही मदत लागल्यास मला केव्हाही सांगावे असे स्पष्ट केले. आपल्या छोट्याशा देणगीमुळे या गोरगरिब वयस्कर लोकांच्या नेत्रचिकित्सा सेवेचे पुण्याचे काम झाल्याचे पाहून नजमुद्दिन व्होरा भारावून गेले.

लायन्स क्लब नागोठणेचे उपाध्यक्ष विवेक करडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या शिबिराला रिहाना व्होरा, सुधाकर जवके, विवेक सुभेकर, संतोष शहासने, सुनिल कुथे, दौलतराम मोदी, विशाल शिंदे, माधुरी सोष्टे, हुनेदभाई सैफी, आब्बासभाई सैफी, जुजरभाई काचवाला, तसनीम काचवाला उपस्थित होते. या कार्यक्रमात विवेक सुभेकर यांनी रुग्णांनी घ्यायची काळजी याचे मार्गदर्शन केले.

# पावसाळी साहित्यांनी तळा बाजारपेठ सजली

**। तळा । वार्ताहर ।**

नुकतीच पावसाळा सुरुवात झाली असल्याने पावसाळ्यात लागणाऱ्या साहित्यांनी तळा बाजारपेठ सजली आहे.

बाजारपेठेत शालेय विद्यार्थ्यांना उपयोगी साहित्य बाजारात दाखल झाले असून विद्यार्थी व त्यांच्या पालकांची शालेय साहित्य खरेदीसाठी रेलचेल सुरू झाल्याचे पहावयास मिळत आहे.सर्व शाळा १५ जूनला सुरू होणार असल्याने बाजारपेठेत वह्या, दप्तर, रेनकोट, छत्र्या, बुट, चप्पल, कमरपट्टे, पेन, कंपासपेटी व इतर साहित्य दुकानदारांनी विक्रीस आणले आहेत. मात्र मागील वर्षापेक्षा यावर्षी किंमती वाढल्याचे दिसत आहे. तरीही ग्राहक, विद्यार्थी पालक बाजारात वस्तू खरेदीसाठी सध्या मोठ्या प्रमाणात येत असल्याचे दिसत आहे.तसेच नागरिकही पावसाळी पूर्व छत्र्या, मेनकापड, रेनकोट इत्यादी साहित्य खरेदी करताना पहावयास मिळत आहेत.मात्र यावर्षी सर्वच वस्तूंच्या किमतीमध्ये वाढ झाल्याने पालकांना अधिकचा आर्थिक फटका बसला आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय २५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६
- ५०००० रूपये किमतीचा CNC मशीन ऑपरेटिंगचा कोर्स मोफत, मोफत, मोफत. पात्रता : १२ वी किंवा १५ वी पास, वयोमर्यादा- ३० वर्षेपर्यंत. पगार- १०००० रूपये, ८ तास ड्युटी, संपर्क : ९०४९६५५५२३
- Vacancies for office staff in Alibag. For interview call 9422383099 Time to call 10 am to 5 pm
- इलेक्ट्रिकल (वायरिंग) कामासाठी गरजू मुलांची (हेल्पर) गरज आहे. चेंढरे गोंधळपाडा ९२७०६१४०७७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# बंद्यांची आरोग्य तपासणी

## जिल्हा कारागृह आणि धर्मादाय आयुक्त कार्यालयाचा उपक्रम

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

जिल्हा कारागृहातील बंद्यांसाठी आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिराचे आयोजन शनिवारी(दि.८) कारागृहात करण्यात आले. या शिबिराला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला असून १८१ बंद्यांची तपासणी करून त्यांना तज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये १२ महिलांचा समावेश होता. अलिबागमधील जिल्हा कारागृह आणि अलिबागमधील सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.

कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्याचे अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक जालिंदर सुपेकर, उपमहानिरीक्षक योगेश देसाई, यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अलिबागमधील सहाय्यक धर्मदाय आयुक्त प्रताप सातव व निरीक्षक सूनील साळुंखे यांच्या सहाय्याने मोफत आरोग्य वैद्यकिय तपासणी व औषधोपचार शिबीर भरविण्यात आले.



या शिबीरामध्ये कामोठे येथील एमजीएम रुग्णालय, डॉ. जी. डी. पोळ फाऊंडेशन, वाय.एम.टी आयुर्वेदीक मेडीकल कॉलेज खारघर, वाय. एम. टी होमीओपॅथिक मेडीकल कॉलेज व हॉस्पीटल खारघर, वाय. एम.टी. दंतवैद्य हॉस्पीटल खारघर, लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल, पटवर्धन हॉस्पीटल पनवेल, या नामंकित वैद्यकिय संस्थामधील तज्ञ वैद्यकिय अधिकारी यांनी अलिबागमधील जिल्हा कारागृहातील बंद्यांची सर्वसाधारण आजार, नेत्र, नाक, कान, त्वचारोग, दंत चिकित्सा तसेच महिलांची स्त्री रोग विषयक वैद्यकिय तपासणी केली.

यावेळी बंद्यांना मार्गदर्शन करून त्यांना मोफत औषधे वाटप केली. कारागृहातील १६९ पुरुष व १२ महिला बंद्यांनी या शिबिरात सहभाग घेतला. शिबीर यशस्वी होण्यासाठी जिल्हा कारागृह अधिक्षक अशोक कारकर, वरिष्ठ तुरुंगाधिकारी रामचंद्र रणनवरे, तुरुंगाधिकारी शशिकांत निकम, किशोर वारगे, विलास इंगळे, देवलाल शिरसाठ, सुभेदार सुनील जाधव, अशोक तांडेल, हवालदार समीर ठोंबरे, वैभव वारंग, गणेश राठोड यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# तळवली येथे वृक्षारोपण

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील तळवली तर्फे अष्टमी येथे वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

गावचे सुपुत्र तथा डॉ. प्रज्योत मरवडे यांच्या सुकन्येच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी दिलेल्या ५० विविध प्रजातींच्या रोपांची लागवड करून वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न करण्यात आला.सदरील रोपांची लागवड ही गावाच्या परिसरात करण्यात येऊन त्यांच्या संरक्षणासाठी कुंपणही करण्यात आले असल्याचे सांगितले आहे. एक तरूण एक रोप याप्रमाणे रोपे दत्तक घेऊन ती वाढविण्याचे व संगोपन करण्याचा निर्धार तरूणांनी यावेळी व्यक्त केला.

**निवडक**

## सचिनचे खोचक ट्विट

**नवी दिल्ली :** भारत विरूध्द पाकीस्तान सामन्यात भारतीय संघ ११९ धावांवर सर्वबाद झाला तेव्हा भारत हा सामना जिंकेल असे क्वचितच कोणाला वाटले असेल. पण, भारतीय गोलंदाजांनी आपली ताकद दाखवत ६ धावांनी विजय नोंदवला आहे. या विजयानंतर सचिन तेंडुलकरने भारतीय संघाचे अभिनंदन केले आणि पाकिस्तानची थोडी खेचली आहे. सचिनने ट्विटरवर लिहिले की, भारत विरुद्ध पाकिस्तान, नवा खंड, मात्र निकाल तोच. असे खोचक ट्विट सचिनने केले आहे.

## क्रिकेट विश्वात शोककळा

**न्युयॉर्क :** भारतीय क्रिकेट विश्वात शोककळा पसरली आहे. मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अमोल काळे यांचे सोमवारी हृदयविकाराच्या झटक्याने न्युयॉर्क येथे निधन झाले. मिळालेल्या माहितीनुसार अमोल काळे यांनी रविवारी (दि.९) न्युयॉर्कला झालेला भारत विरुद्ध पाकिस्तान सामना स्टेडियममध्ये जाऊन पाहिला होता. त्यांच्यासह एमसीएचे काही अधिकारी देखील होते. दरम्यान, त्यांच्या निधनाची बातमी समजल्यानंतर देशभरातून शोक व्यक्त होत आहे.

## दिल्ली पोलिसांचा चिमटा

**नवी दिल्ली :** भारताने पाकिस्तानचा पराभव केल्यानंतर दिल्ली पोलिसांनी एक भन्नाट ट्विट केले. त्यांनी एनवायपीडीला टॅग करत पाकिस्तानची चांगलीच खेचली आहे. पाकिस्तानच्या पराभवानंतर दिल्ली पोलिसांनी त्यांच्या अधिकृत ट्विटर अकाऊंटवरून एक ट्विट शेअर केले. त्यांनी न्यूयॉर्क पोलिसांना टॅग करत लिहिले की, आम्ही दोन जोरदार आवाज ऐकले आहेत. एक इंडिया इंडियाचा आवाज आणि दुसरा टेलिव्हिजन फुटण्याचा आवाज. तुम्ही या गोष्टीची खातरजमा करू शकता का?

## शोएबची रिझवानवर टीका

**लाहोर :** भारत विरूध्द पाकिस्तान सामन्यात पाकिस्तानने प्रथम गोलंदाजी करत भारताला ११९ धावांत सर्वबाद केले. सामना पाकिस्तानच्या हातात होता. मात्र, भारतीय गोलंदाजांनी पाकिस्तानला ११३ धावांत रोखले. सामना हरल्यानंतर शोएब अख्तर म्हणाला कि, खूप निराशाजनक. पाकिस्तानसाठी हा सामना बॉल टू रन असा होता. पाकिस्तान संघ विजयाच्या खूप जवळ होता. रिझवनने अजून २० धावा केल्या असत्या तर संघ विजयाच्या जवळ पोहचला असता. दुर्दैवाने आपण आपलं डोकंच चालवले नाही.

## रोहितने पांड्याला उचलले

**न्युयॉर्क :** भारताने पाकिस्तानचा तोंडचा घास पळवत टी-२० विश्वचषकातील आपला सलग दुसरा विजय प्राप्त केला. पाकिस्तानने भारताला ११९ धावात सर्वबाद केले होते. मात्र, भारतीय गोलंदाजांनी दमदार मारा करत पाकिस्तानला २० षटकात ७ बाद ११३ धावात रोखले. दरम्यान, पाकिस्तानी फलंदाज बाद झाल्यानंतर रोहित शर्माने हार्दिक पांड्याला आनंदाने मिठी मारत उचलूनच घेतले. हा फोटो सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.

# भारताचे पाकिस्तानवर सर्जिकल स्ट्राईक

**विश्वचषकातील पाकिस्तानचे आव्हान संपुष्टात | बुम बुम बुमराह ठरला नायक**




### पाकिस्तानचे आव्हान संपुष्टात

या पराभवामुळे पाकिस्तानचे स्पर्धेतील आव्हान संकटात आले आहे. ‘अ’ गटातील भारताचा सलग दुसरा विजय ठरला आणि आता अमेरिका व भारत प्रत्येकी ४ गुणांसह आघाडीवर आहेत. पाकिस्तानने उर्वरित दोन सामने जिंकून त्यांचे ४ गुण होतील. परंतु, त्याचवेळी त्यांना अमेरिकेच्या उर्वरित दोन सामन्यांत पराभवासाठी प्रार्थना करावी लागेल. अशावेळी नेट रन रेट महत्त्वाचा ठरेल.

### बुमराह ठरला पाकिस्तानचा कर्दनकाळ

न्यूयॉर्कमध्ये पाकिस्तानविरुद्ध भारतीय संघ सामना जिंकला त्याचा नायक होता जसप्रीत बुमराह. या सामन्यात बूम बूमने ज्या पद्धतीने गोलंदाजी केली, त्यावरून १२० धावांचे माफक लक्ष्य असतानाही पाकिस्तानी फलंदाज गुडघे टेकताना दिसत होते. जसप्रीत बुमराहने ४ षटकातील २४ चेंडूत केवळ १४ धावा दिल्या आणि तीन बळी घेतले. विशेष म्हणजे बूम बूमच्या २४ पैकी १५ चेंडू निर्धाव होत्या.




**। न्यूयॉर्क । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने पुन्हा एकदा पाकिस्तानला लोळवले आहे. १२० धावांचे सोपे लक्षही पाकिस्तानला झेपले नाही. एकीकडे पूर्ण सामना पाकिस्तानच्या बाजूने झुकलेला असताना भारतीय क्रीडाप्रेमींनी आशा सोडून दिली होती. १४व्या षटकापर्यंत संपूर्ण सामन्यावर पाकिस्तानची पकड होती. पाकिस्तानने १४ षटकांत ३ गडी गमावून ८० धावा केल्या होत्या. ३६ चेंडूत ४० धावांची गरज होती आणि सात गडी हातात होते. अशावेळी भारतीय कर्णधार रोहित शर्माने आपल्या भात्यातील अस्त्र बाहेर काढले आणि १५वे षटक जसप्रीत बुमराहच्या हाती सोपवले. या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर बुमराहने सेट फलंदाज रिझवानचा त्रिफळा उडवला. रिझवानच्या बळी नंतर भारतीय संघ सामन्यात परतला. त्यानंतर भारतीय गोलंदाजांनी त्यांना डोकं वर काढूच दिले नाही. हातात राखीव गडी असूनही पाकिस्तानला ६ धावांनी पराभवाचे तोंड पाहावे लागले.

दरम्यान, हलक्या पावसाच्या सरींमुळे नाणेफेक जिंकणारा कर्णधार पहिली गोलंदाजी घेणार हे नक्की होते. संघात चार दर्जेदार वेगवान गोलंदाज असल्याने बाबर आझमने नेमके तेच केले. प्रथम फलंदाजी करताना रोहित शर्मा, विराट कोहलीची जोडी सलामीसाठी मैदानात उतरली. शाहीन शाह आफ्रिदीच्या षटकात रोहितने मारलेला षटकार प्रेक्षकांत जाऊन पडला. परंतु, रोहित पुढच्या षटकात झेल देऊन परतला. जम बसवायला थोडा वेळ घेणाऱ्या रिषभ पंतने हारीस रौफला एकाच षटकात तीन चौकार मारल्याने १० षटकांअखेर भारताच्या खात्यात ८१ धावा जमा झाल्या होत्या. भारतीय फलंदाज अडचणीतून मार्ग काढत १४० धावांचा टप्पा गाठणार वाटत असताना मधल्या फळीत पडझड झाली. ३ बाद ८९ धावांवरून ७ बाद ९६ धावसंख्या झाली. चार फलंदाज पाठोपाठ बाद झाले ज्यात ४२ धावा करणारा रिषभ पंतही होता. भारताचे सगळे फलंदाज वेगवान गोलंदाजांना बाद झाले. ज्यात ८ फलंदाज झेलबाद झाले. आणि १९ षटकात भारताचा डाव ११९ धावांवर आटोपला.

टी-२० विश्वचषक स्पर्धेतील भारताची ही प्रथम फलंदाजीनंतर तिसरी निचांक धावसंख्या आहे. यापूर्वी २०१६ मध्ये ७९ धावांवर भारतीय संघ सर्वबाद झाला होता. सर्वबाद झाल्यानंतर भारतीय संघाला सर्वच्या सर्व ११ सामन्यांत हार पत्करावी लागलेली आहे. पाकिस्तानने टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या इतिहासात प्रथमच भारताला सर्वबाद केले.

## अमृता भगतला सुवर्ण



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील शेलू गावातील अमृता ज्ञानेश्वर भगत हिने राष्ट्रीय पॉवरलिफ्टींग स्पर्धेत सुवर्ण पदकाची कमाई केली. राजस्थान राज्यातील श्री गंगानगर येथे राष्ट्रीय पॉवरलिफ्टींग स्पर्धा खेळविली गेली होती.

अमृता भगत हिने राष्ट्रीय पॉवरलिफ्टींग स्पर्धेत सब ज्युनियर गटात सहभाग घेतला. महारष्ट्र राज्य संघातून खेळणाऱ्या या रायगड पॉवरलिफ्टींग स्पोर्ट्स असोसिएशनकडून सहभागी झाली होती. राष्ट्रीय पॉवरलिफ्टींग स्पर्धेत सब ज्युनियर गटात अमृता हिने सुवर्ण पदकाची कमाई केली. जगातील सब ज्युनियर स्पर्धेत देखील अमृता हिने पदकाची कमाई केली होती.

## महाराष्ट्राच्या कन्येची देदीप्यमान कामगिरी

**। पोर्टलँड । वृत्तसंस्था ।**

आशियाई अजिंक्यपद स्पर्धेमध्ये ब्राँझपदक पटकावणारी संजीवनी जाधव हिने पोर्टलँडमधील अॅथलेटिक्स स्पर्धेतील महिलांच्या १० हजार मीटर शर्यतीत पहिल्या क्रमांकावर झेप घेताना देदीप्यमान कामगिरी केली.




महाराष्ट्राच्या या कन्येने ३२.२२.७७ सेकंद अशी वेळ देत ही शर्यत जिंकण्याचा पराक्रम करून दाखवला. ही तिची आतापर्यंतची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी ठरली आहे. मागील वर्षी तिने या स्पर्धेत ३२.४६.८८ सेकंद अशा वेळेसह शर्यत पूर्ण करीत दुसरा क्रमांक पटकावला होता. यंदा तिने एक पाऊल आणखी पुढे टाकले. या शर्यतीत भारताची आणखी एक महिला खेळाडू सहभागी झाली होती. सीमा हिने ही शर्यत ३२.५५.९१ सेकंद अशा वेळेसह पूर्ण करीत पाचवे स्थान पटकावले आहे. तर, भारताची तिसरी खेळाडू पारुल चौधरी हिने महिलांच्या स्टीपलचेस शर्यतीत तिसरे स्थान पटकावले. तिने ९.३१.३८ सेकंद अशा वेळेसह शर्यत पूर्ण केली. भारताच्याच प्रीती हिला मात्र निराशेला सामोरे जावे लागले. तिने १०.१२.८८ सेकंद अशा वेळेसह शर्यत पूर्ण केली. तिची २०व्या स्थानावर घसरण झाली.

महाराष्ट्राचा पुरुष अॅथलीट अविनाश साबळे याने तीन हजार मीटर स्टीपलचेस शर्यत ८.२१.८५ सेकंद अशा वेळेसह पूर्ण केली आणि दुसरे स्थान मिळवले. अमेरिकेच्या केनेथ रुक्स याने ८.१८.७७ अशा वेळेसह शर्यत पूर्ण केली आणि अजिंक्यपदाला गवसणी घातली. या स्पर्धेचा विक्रम ८.१८.५५ सेकंद असा होता. केनेथ हा विक्रम मोडण्यापासून थोडक्यात दूर झाला.

## राज्य मानांकन कॅरम स्पर्धा

**। कोल्हापूर । प्रतिनधी ।**

पुण्याच्यासुखबिंदरकटनोरियाने माजी राष्ट्रीय विजेत्या मुंबईच्या संदीप देवरुखकर याला पराभूत करताना महाराष्ट्र राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत आगेकूच केली. श्री दत्तराज चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने हॉटेल मंगलम येथे ही स्पर्धा सुरू आहे. तिसऱ्या फेरीच्या लढतीत सुखबिंदर कटनोरियाने संदीप देवरुखकरचा १५-१२, २५-११ असा सरळ दोन सेटमध्ये पराभव केला आणि चौथी फेरी गाठली. तत्पूर्वी नृसिंहवाडीचे माजी सरपंच धनाजीराव जगदाळे यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. इतर लढतींमध्ये पंकज पवार, अशोक गौर व फहिम काझी या मुंबईच्या खेळाडूंनी विजय मिळवत पुढे पाऊल टाकले. रवींद्र हांगे, रहीम खान, प्रकाश गायकवाड या पुण्याच्या खेळाडूंनी प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवला.



## पीएनपी नागाव समर स्विमिंग कॅम्पची सांगता

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या सायरस पूनावाला सीबीएसई स्कूल नागाव येथे दि.२ मे ते ३ जूनपर्यंत समर स्विमिंग कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. याची सांगता दि.५ जून रोजी करण्यात आली. यावेळी जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पहिला गट ८ वर्षाखालील मुले व मुली, दुसरा गट १० वर्षाखालील गट मुले व मुली, तिसरा गट १४ वर्षाखालील मुले व मुली अशी स्पर्धा पार पडली.




सांगता समारंभासाठी प्रमुख मान्यवर माजी जिल्हा परिषद सदस्य द्वारकानाथ नाईक, नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर, माजी सरपंच निखिल मयेकर, आक्षीच्या सरपंच रश्मी पाटील, तसेच पीएनपी कार्यालयाकडून अॅकॅडमिक डायरेक्टर श्रुती सुतार, राजश्री पाटील, अकाऊंट हेड मनिषा रेलकर, शाळेच्या मुख्याध्यापिका गीतीका भूचर, उपमुख्याध्यापिका बर्टीना मेलीट तसेच शाळेचे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आदि उपस्थित होते.

यावेळी शिबिराच्या सांगता समारंभा प्रसंगी सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. हे शिबीर उत्साहात खेळीमेळीच्या वातावरणात पार पडले. मुलांना पोहण्याचे प्रशिक्षक ज्योती घरत यांनी दिले. यांच्या समवेत राकेश म्हात्रे, जीवरक्षक सनी प्रधान यांनी विशेष मेहनत घेतली.

## छ. संभाजी किंग्सचा तिसरा विजय

**■ पुणेरी बाप्पाचा सात गडी राखून पराभव**

**। पुणे । प्रतिनिधी ।**

पुणे महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्यावतीने आयोजित महाराष्ट्र प्रीमियर लीग स्पर्धेत आठव्या दिवशी पहिल्या लढतीत दिग्विजय पाटील (नाबाद ४८) व दिग्विजय जाधव (नाबाद २०) यांनी केलेल्या सयंमपूर्ण अर्धशतकी भागीदारीच्या जोरावर छत्रपती संभाजी किंग्स संघाने पुणेरी बाप्पा संघाचा ७ गडी राखून पराभव करत तिसरा विजय मिळवला.





गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या आंतरराष्ट्रीय मैदानावर सुरु झालेल्या या स्पर्धेत विजयासाठी छत्रपती संभाजी किंग्स संघाला १४५ धावांचे आव्हान होते. सलामवीर सौरभ नवले ६ धावांवर तंबूत परतला. ओमकार खाटपे (३०) व ओम भोसले (२७) यांनी दुसऱ्या विकेटसाठी ३४ चेंडूत ५० धावांची भागीदारी करून संघाच्या डावाला आकार दिला. आठव्या षटकातील दुसऱ्याच चेंडूवर ओम भोसले २७ धावांवर झेल बाद झाला. रोशन वाघसरेने त्याचा बळी घेत अडसर दुर केला. त्यानंतर दिग्विजय पाटीलने ३२ चेंडूत नाबाद ४८ धावांची संयमी खेळी केली. त्याने ९ चौकार मारले. दिग्विजय पाटील व ओमकार खाटपे (३०) यांनी चौथ्या विकेटसाठी ३८ चेंडूत ५२ धावांची भागीदारी करून संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

## कार्लोसने जिंकले फ्रेंच ओपनचे विजेतेपद | अलेक्झँडर झ्वेरेवला दिला पराभवाचा धक्का

**। फ्रेंच । वृत्तसंस्था ।**

फ्रेंच ओपन स्पर्धेतील पुरुष एकेरीचे विजेतेपद स्पेनच्या २१ वर्षीय कार्लोस अल्काराझने जिंकले आहे. त्याने पॅरिसमध्ये रविवारी झालेल्या अंतिम सामन्यात जर्मनीच्या अलेक्झँडर झ्वेरेव (साशा) याला पराभवाचा धक्का दिला. अत्यंत रोमांचक झालेल्या अंतिम सामन्यात ४ तास १९ मिनिटाच्या झुंझीनंतर अल्काराझने साशाला ६-३, २-६, ५-७, ६-१, ६-२ अशा पाच सेटमध्ये पराभूत केले.

अल्काराझचे हे फ्रेंच ओपनचे पहिलेच विजेतेपद आहे. तसेच, एकूण कारकिर्दीतील तिसरे ग्रँड स्लॅम विजेतेपद आहे. त्याने यापूर्वी २०२२ मध्ये अमेरिकन ओपन आणि २०२३ मध्ये विम्बल्डनचे विजेतेपद जिंकले आहे. या संपूर्ण सामन्यात दोन्ही खेळाडूंनी शेवटपर्यंत एकमेकांना कडवी झुंज दिली होती. मात्र, अल्काराझने अखेरीस बाजी मारली, त्याने मोक्याच्या क्षणी त्याचा खेळ उंचावला. त्याने मिळवलेल्या १६ ब्रेक पॉइंट्सपैकी ९ जिंकले. मात्र, साशाला २३ ब्रेक पॉइंट्सपैकी केवळ ६ जिंकता आले. अल्काराझने पहिला सेट सहज जिंकला होता, पण नंतर साशाने दुसऱ्या सेटमध्ये दमदार पुनरागमन करत अल्काराझला वरचढ होण्याची संधी दिली नाही. यानंतर तिसऱ्या सेटमध्ये दोघांमध्येही कडवी झुंज पाहायला मिळाली. पण तिसरा सेटही साशाने जिंकत आघाडी मिळवली. मात्र, अल्काराझनेही हार न मानता चौथा सेट जिंकला. त्यामुळे हा सामना पाचव्या आणि निर्णायक सेटमध्ये गेला. पाचवा सेट अल्काराझने सहज जिंकत विजेतेपदालाही गवसणी घातली.



### नदालचा मोठा विक्रम मोडण्याची संधी

अल्काराझ हा तीन वेगवेगळ्या पृष्ठभागावर ग्रँडस्लॅम जिंकणारा सर्वात युवा टेनिसपटू आहे. त्याने स्पेनच्या राफेल नदालचा विक्रम मोडला आहे. नदालने वयाच्या २२व्या वर्षी असा कारनामा केला होता. टेनिसमध्ये वर्षातून चार ग्रँड स्लॅम स्पर्धा होतात. त्यातील ऑस्ट्रेलियन ओपन आणि अमेरिकन ओपन हार्ड कोर्टवर होते, तर विम्बल्डन ग्रास कोर्टवर होते. तसेच, फ्रेंच ओपन लाल मातीच्या कोर्टवर खेळवली जाते. अल्काराज २१ व्या वर्षापर्यंतच अमेरिकन ओपन, विम्बल्डन आणि आता फ्रेंच ओपनही जिंकल्याने त्याने तिन्ही प्रकारच्या कोर्टवर जिंकण्याचा पराक्रम केला आहे. अल्काराज तीन्ही प्रकारच्या कोर्टवर जिंकणारा एकूण सातवा पुरूष टेनिसपटू आहे. यापूर्वी राफेल नदाल, मॅट्स विलँडर, जिमी कॉनर्स, रॉजर फेडरर, नोवाक जोकोविच आणि आंद्रे आगासी यांनी असा विक्रम केला आहे.

## उरुग्वे फुटबॉल संघाची घोषणा

**। माँटेव्हिडियो । वृत्तसंस्था ।**

उरुग्वे फुटबॉल संघाची घोषणा रविवारी करण्यात आली. लुईस सुआरेझ या अनुभवी खेळाडूची या संघात निवड करण्यात आली आहे. कोपा अमेरिका या प्रतिष्ठेच्या फुटबॉल स्पर्धेसाठी संघ जाहीर करण्यात आला असून राष्ट्रीय प्रशिक्षक मार्सेलो बिल्सा यांच्याकडून ही घोषणा करण्यात आली. उरुग्वे संघाचा ‘क’ गटात समावेश असून या गटात त्यांना अमेरिका, पनामा व बोलिविया या देशांचा सामना करावा लागणार आहे. लुईस सुआरेझ पाचव्यांदा कोपा अमेरिका ही स्पर्धा खेळणार आहे.

संघ : गोलरक्षक- सर्जियो रोचेट, सँटीयागो मेल, फ्रँको इस्रायल. बचावपटू- रोनाल्ड अरॉजो, जॉस गिमनेज, सेबॅस्टीन सेरेस, निकोल्स मॅरीकल, मथास ओलिवेरा, लुकास ओलाझा, मतास व्हिया, गिर्लेमो वरेला, नाहीत्न एन. मधली फळी- मॅन्यूएल उगार्टे, रॉड्रिगो बेतांकुर, फेडरिको वालवर्दे, इमिलियानो मार्टीनेझ, निकोल्स क्रूझ, गिऑरजियन अरासकेएटा, अगस्टन कॅनोबियो. आक्रमक फळी- ब्रायन रॉड्रिगेझ, ब्रायन ओकॅम्पो, फाकुंडो पेलिस्ट्री, मॅक्सिमिलानो अरॉजो, ख्रिस्तीन ओलिव्हेरा, डार्विन नेज, लुईस सुआरेझ.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)